cmyk

## संपादकीय

### तत्त्वशून्य हातमिळवणी...

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे काही घडते आहे त्यामुळे चांगल्या चांगल्यांना अवाक् केले आहे. बोलायचे काय किंवा बोलायचे तरी कशाला येथपर्यंत सगळ्या गोष्टी पोहोचल्या आहेत. देश आणि राज्यपातळीवर भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेस परस्परांचे कट्टर प्रतिस्पर्धी आहेत. तसाच असदुद्दीन ओवेसी यांचा एमआयम पक्षही भाजपला न चालणारा.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२५३ | शनिवार दि.१० जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### महाराणी ताराराणी यांच्या नावे टपाल तिकीट

नवी दिल्ली: महाराणी ताराराणी यांच्या नावे टपाल तिकीट काढण्याचा महत्वाचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. महाराणी ताराराणी यांचे ३५० वे जयंतीवर्ष आहे. त्यानिमित्त सरहद, पुणे यांच्या वतीने देशभर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. सरहदच्या वतीने केंद्रीय दुरसंचार मंत्री ज्योतीरादित्य शिंदे यांच्याकडे महाराणींच्या नावे टपाल तिकिट काढण्यात यावे, अशी मागणी केली होती. या मागणीनंतर भारताच्या गौरवशाली इतिहासातील एक तेजस्वी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असलेल्या महाराणी ताराराणी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ज्योतिरादित्य शिंदे यांच्या पुढाकाराने आणि महाराष्ट्र सरकारच्या अनुमोदनाने केंद्र सरकारने त्यांच्या नावे टपाल तिकिट काढण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, लवकरच एका भव्य कार्यक्रमाता या टपाल तिकिटाचे विमोचन करण्यात येणार आहे.

### चार हजार गृहप्रकल्पांपासून 'महारेरा' अनभिज्ञ

मुंबई: 'महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरण' (महारेरा) कडे २०१७ पासून नोंदणी झालेल्या राज्यातील सुमारे चार हजार प्रकल्पांबाबत काहीही माहिती उपलब्ध नसल्याची गंभीर बाब उघड झाली आहे. या प्रकरणी महारेराने विविध ४४५ नियोजन प्राधिकरणे, यंत्रणांना पत्रे पाठवून या प्रकल्पांविषयी अधिक माहिती मागविली आहे. हे प्रकल्प पूर्ण झाले का अथवा या प्रकल्पांची सद्यस्थिती काय आहे, याचा आढावा घेण्यास महारेराने सुरुवात केली आहे. आतापर्यंत राज्यात दहा हजारहून अधिक गृहप्रकल्प मुदतवाढ न घेतल्यामुळे व्यपगत झाले आहेत. ही संख्या कमी–अधिक होत असते. संबंधित विकासकांना वर्षभराची मुदतवाढ दिली जाते. त्यानंतर हे प्रकल्प अधिकृत ठरतात. मात्र चार हजार प्रकल्प असे आहेत जे व्यपगत झालेले असले तरी या प्रकल्पांची काहीच माहिती उपलब्ध नाही. हे प्रकल्प प्रत्यक्ष सुरु आहेत का, याबाबत महारेरा अनभिज्ञ असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### लालू व इतरांविरुद्ध आरोप निश्चित करण्याचे आदेश

नवी दिल्ली: दिल्लीतील राउज ॲव्हेन्यू न्यायालयाने शुक्रवारी राष्ट्रीय जनता दल पक्षाचे प्रमुख लालू प्रसाद यादव, त्यांच्या कुटुंबातील सदस्य आणि इतरांविरुद्ध लँड फॉर जॉब कथित भ्रष्टाचार प्रकरणी आरोप निश्चित करण्याचे आदेश दिले. न्यायालयाने लालू यादव यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत भ्रष्टाचाराच्या गुन्ह्यासह भारतीय दंड संहिते (आयपीसी) अंतर्गत इतर आरोप निश्चित केले. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांवर फसवणूक आणि गुन्हेगारी कटाचे आरोप निश्चित करण्यात आले. हे प्रकरण केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) च्या आरोपांशी संबंधित आहे. विशेष न्यायाधीश विशाल गोगने यांनी हा आदेश दिला. ते म्हणाले की, यादव यांनी रेल्वे मंत्रालयाचा वापर आपली वैयक्तिक जहागीर म्हणून केला. त्यांनी एक गुन्हेगारी कट रचला. यामध्ये रेल्वे अधिकारी आणि त्यांच्या जवळच्या साथीदारांच्या संगनमताने यादव कुटुंबाने जमिनीचे भूखंड मिळवण्यासाठी सार्वजनिक नोकरीचा सौदेबाजीचे साधन म्हणून वापर केला.

### बस दरीत कोसळून ८ प्रवाशांचा मृत्यू

शिमला: हिमाचल प्रदेशच्या सिरमौर जिल्ह्यातील हरिपूरधार येथे एका खासगी बस अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला आहे आणि अनेक जण जखमी झाले आहेत. जखमींना घटनास्थळावरून बाहेर काढले जात आहे. बचाव कार्य वेगाने सुरू आहे. स्थानिक लोकांनी जखमींना रस्त्यावर आणले. अपघात इतका भीषण होता की बस पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, सिरमौरचे पोलिस अधीक्षक (एसपी) एनएस नेगी घटनास्थळी दाखल झाले आहेत. त्यांनी सांगितले की, अंदाजे आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. पोलिस बचाव कार्यात सामील झाले आहेत. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, जेव्हा बस हरिपुरधार बाजारपेठेतून शिमल्याच्या दिशेने निघाली, त्याच वेळी हा अपघात घडला. बाजारपेठेपासून अवघ्या १०० ते २०० मीटर पुढे जाताच चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बस रस्त्यावरून घसरून थेट खोल दरीत कोसळली. बसमध्ये सुमारे ३६ हून अधिक प्रवासी होते.

# शेतकऱ्यांना लुटणाऱ्या कापूस व्यापाऱ्यांवर आयकर विभागांची संक्रात !

## संभाजीनगरमध्ये धाडसत्र सुरू, टीडीएस तरतुदीचे पालन न केल्याचा ठपका

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

**महाराष्ट्र भरात कापूस व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर लूट केली असून, हेच व्यापारी टीडीएस मध्ये आयकर विभागाला सुद्धा चुना लावीत आहेत. अशा व्यापाऱ्यांवर ७ जानेवारी २०२५ पासून मराठवाडाभरात आयकर विभागाने धाडसूत्र सुरू केले आहे. आयकर विभाग कायदा १९६१ अंतर्गत टीडीएस तरतुदीचे पालन न केल्याबद्दल अनेक कापूस व्यापाऱ्यांची सखोल चौकशी आयकर विभागाने सुरू केली आहे.**



छत्रपती संभाजीनगर येथे आयकर विभागाने मोठ्या प्रमाणावर कापूस व्यापाऱ्यावर धाडसत्र सुरू केले असून, कापूस व्यापार करणाऱ्या कंपन्या आणि त्यांच्या कार्यालयाचा आयकर विभागाने कागदपत्र तपासणी सर्वे सुरू केला आहे. कंपनीने दिलेल्या व्याजावर लागू असलेला दहा टक्के टीडीएस कापला नाही आणि इतर व्यवहारानंतर कापलेला टीडीएस केंद्र सरकारच्या खात्यात जमा केला नाही या कारणास्तव टीडीएस अधिकाऱ्यांनी कंपनीची सखोल चौकशी सुरू केली आहे. आयकर कायदा १९६१ च्या कलम १६४ च्या तरतुदीनुसार कोणत्याही कंपनीसाठी व्याज देताना दहा टक्के टीडीएस कापणे बंधनकारक आहे तथापि कंपनीने सुमारे वीस कोटी रुपयाचा दिलेल्या व्याजावर कोणताही कर कापला नाही असा आरोप आहे. शिवाय कंपनीने इतर व्यवहारानंतर कापलेले सुमारे ७१ लाख सरकारी खात्यात जमा केले नाही असाही आरोप आहे. सर्वेदरम्यान व्याजासह ही रक्कम वसुली करण्यात येत आहे. आयकर विभागाने संबंधित सर्व आयकर कायदा १९६१ च्या नुसार टीडीएस नियमाचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन केले आहे.

# खासगी कोचिंग वर्गांवर आता कडक निर्बंध

## जिल्हास्तरीय निरीक्षण समिती होणार स्थापन, न्यायालयाचे निर्देशामुळे निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

स्पर्धा परीक्षा, शाळा आणि खासगी शिकवणी वर्गांमधून विद्यार्थ्यांवर वाढत चाललेला मानसिक ताण, तक्रारींची वाढती संख्या आणि सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट निर्देशांच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने कडक निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताणतणाव निर्माण होऊ नये यासाठी शाळा व खासगी शिकवणी वर्गांसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना लागू करत जिल्हास्तरीय निरीक्षण समिती स्थापन करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

विद्यार्थ्यांवर शाळा आणि



विशेषतः खासगी शिकवणी व कोचिंग वर्गांमधून होणाऱ्या मानसिक ताणतणावाबाबत दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली होती. सुखदेव सहा यांनी आंध्र प्रदेश सरकारविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या

▶▶ पान २ वर

### नियमभंग झाल्यास कठोर कारवाई

शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांवर अनावश्यक शैक्षणिक व मानसिक दबाव टाकणाऱ्या शाळा व खासगी शिकवणी वर्गांवर आता जिल्हास्तरावर थेट नजर ठेवली जाणार असून, नियमभंग झाल्यास कठोर कारवाईचा इशाराही शासन निर्णयातून देण्यात आला आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय निरीक्षण समिती स्थापन करण्यात आली आहे.

### पाच तास आणि वेळेचीही घातली मर्यादा

एका दिवसात पाच तासांपेक्षा अधिक शिकवणी घेण्यास मनाई करण्यात आली असून, सकाळी फार लवकर किंवा सायंकाळी फार उशिरा वर्ग घेता येणार नाहीत. आठवड्यात किमान एक दिवस साप्ताहिक सुटी देणे बंधनकारक करण्यात आले असून, त्या सुटीच्या दुसऱ्या दिवशी कोणतीही चाचणी, परीक्षा किंवा मूल्यमापन घेता येणार नाही. सण–उत्सवांच्या काळात विद्यार्थ्यांना कुटुंबासोबत वेळ घालवता यावा यासाठी सुट्ट्यांचे नियोजन करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

### यशाची हमी देणारे दावे करण्यास मनाई

खाजगी शिकवणी वर्गांनी घेतलेल्या चाचण्यांचे निकाल सार्वजनिकरित्या प्रसिद्ध करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हे निकाल केवळ विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक मूल्यमापनापुरते मर्यादित ठेवण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा अन्य स्पर्धा परीक्षांमध्ये यशाची हमी देणारे दावे करण्यास मनाई करण्यात आली असून, प्रवेश म्हणजे यशाची खात्री नव्हे, हे पालक व विद्यार्थ्यांना स्पष्टपणे सांगणे वर्गांना बंधनकारक राहणार आहे.

## दडपशाहीमुळे जनता दहशतीत – वडेट्टीवार

मुंबई । प्रतिनिधी



**सत्ताधारी महायुतीच्या धाक, दडपशाहीमुळे जनता दहशतीत असल्याचा दावा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना केला. महापालिकेच्या निवडणुकीत पातळी सोडून एकमेकांवर टीका केली जात आहे.**

राज्यात येत्या १५ तारखेला मुंबईसह २९ महापालिकांच्या निवडणुकीचा फड रंगणार आहे. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुतीमधीलच भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या ३ घटकपक्षांमध्ये राजकीय कलगीतुरा रंगला आहे. विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना या मुद्यावरून महायुतीवर चांगलाच निशाणा साधला. ते म्हणाले, महापालिकेच्या निवडणुकीत सध्या पातळी सोडून टीका केली जात आहे. अजित पवार व पुण्यातील एका स्थानिक आमदाराचे विधान ऐकले, तर हे लोक एकमेकांच्या अंगावर तलवारी घेऊन धावून जायचेच राहिलेत. कुणी दरोडा म्हटले, तर कुणी औकात काढली. ▶▶ पान २ वर

# परळीत एमआयएम शिंदे, अजित पवारासोबत

## बीडमध्येही एमआयएमचा नगरसेवक राष्ट्रवादीसोबत जाण्याची शक्यता

बीड । प्रतिनिधी

**महायुतीत भाजपसोबत सत्तेत असलेले त्यांचे मित्रपक्ष म्हणजेच शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांनीही भाजपच्या पावलावर पाऊल टाकल्याचे दिसत आहे. भाजपनंतर शिंदे आणि अजित पवार एमआयएमसोबत परळी नगरपालिकेत एकत्र आले आहेत. बीड जिल्ह्यात एमआयएमचे बीड आणि परळी पालिकेत प्रत्येकी एक नगरसेवक निवडून आले आहेत. परळीतील एकमेव सदस्य राष्ट्रवादी, शिवसेनेसोबत गेले तर बीड पढील एक नगरसेवक हाही त्याच मार्गावर आला तर आश्चर्य वाटायला नको.**

राज्यात महापालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत युती, आघाडी यांनाही जोर चढला आहे. अंबरनाथमध्ये भाजपने




काँग्रेसशी हातमिळवणी केली होती तर अकोटमध्ये भाजपने सत्तेसाठी चक्क ऑल इंडिया इत्तेहादूल मुस्लिमीनशी युती केली होती. भाजप हा काँग्रेस आणि एमआयएम सोबत जाण्याच्या प्रयत्नात असल्याचे वृत्त आल्यावर मोठा गोंधळ उडाला. मुख्यमंत्री देवेंद्र ▶▶ पान २ वर

# राज्यात 'आरटीई' प्रवेशांची प्रक्रिया सुरू !

## १४ जानेवारी पर्यंत शाळा नोंदणी आणि पडताळणीची प्रक्रिया

पुणे । प्रतिनिधी

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी राज्यातील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया अखेर सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार आरटीई प्रवेशासाठीचे संकेतस्थळ सुरू करण्यात आले असून, ९ जानेवारी पासून प्रक्रिया सुरु झाली असून, ती १४ जानेवारी २०२६ पर्यंत असेल. या कालावधीत शाळा नोंदणी आणि पडताळणीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

राज्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी आरटीई प्रवेशासाठी शाळा नोंदणीबाबत शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, महापालिकांचे प्रशासन




अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. आर्थिक दुर्बल, वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना हक्काचे आणि मोफत शिक्षण मिळण्यासाठी आरटीईअंतर्गत खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे राबवण्यात येते. राज्यभरातील सुमारे आठ हजारांहून अधिक शाळांतील एक लाखांहून अधिक जागा या प्रवेशांसाठी उपलब्ध होतात.सीबीएसई, आयसीएसई, राज्य मंडळाशी संलग्न शाळांकडून पूर्वप्राथमिक, पहिलीच्या स्तरावर आरटीईअंतर्गत प्रवेश देण्यात येतात. या प्रवेशांसाठी ऑनलाईन प्रक्रिया राबवण्यात येते. ▶▶ पान २ वर

## राज ठाकरे इतिहासातील सर्वात मोठ्या पराभवाचे धनी होतील–मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

मनसेचे सर्वेसर्वा असलेले राज ठाकरे हे केवळ पराभूत होणार नाहीत, तर इतिहासातील सर्वात मोठा पराभवाचे ते धनी म्हणून ओळखले जातील, आज मी त्याची भविष्यवाणी करतो, निकाल आल्यानंतरच तुम्ही पहाच, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एका हिंदी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले. यावेळी त्यांनी निवडणूकीच्या निमित्ताने एकत्र आलेल्या



दोन्ही भावांवर टीकास्त्र सोडले.

मुलाखतीमध्ये बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी चौफेर फटकेबाजी केली. यावेळी राज व उद्धव ▶▶ पान २ वर

## दुचाकी-कार अपघातात तीन मित्र ठार

गंगाखेड । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील किनगाव येथील उरूसावरून गंगाखेड तालुक्यातील आनंदवाडी या गावी परत येत असताना दि. ८ रोजी रात्री ११.३० च्या सुमारास दुचाकी व कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात आनंदवाडी गावातील तीन मित्र ठार झाले. ▶▶ पान २ वर

# राज्यात हाडं गोठवणारी थंडी हवामान विभागाकडून अलर्ट जारी

## मराठवाड्यात कोरडे पण थंड वातावरण राहणार

मुंबई । प्रतिनिधी

नव्या वर्षात पुन्हा एकदा राज्यभर थंडीची लाट येण्याचे संकेत मिळाले असून, गारठा अधिक वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे सकाळी आणि रात्री नागरिकांना विशेष थंडीचा अनुभव येण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह संपूर्ण कोकण



किनारपट्टीत आकाश अंशतः ढगाळ राहणार आहे. सकाळच्या वेळेत काही भागांत धुक्याची दाटी दिसू शकते. दरम्यान, मराठवाड्यात कोरडे पण थंड वातावरण राहणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

मुंबई आणि उपनगरांमध्ये कमाल तापमान २९ ते ३१ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याची शक्यता असून, किमान तापमान १९ ते २१ अंशांपर्यंत घसरू शकते. समुद्राच्या प्रभावामुळे तीव्र थंडी जाणवणार नसली तरी पहाटे गार हवा ▶▶ पान २ वर


छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352

महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
• डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता–पायात मुंग्या येणे)
• झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
• व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
• बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
• स्मृती भंग (विसरभोळेपणा)
• लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
• स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या

नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
कु.डॉ.जयश्री श्रीराम टेकाळे (M.B.B.S.) वैद्यकिय अधिकारी, मो.7743990988
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) सामाजिक कार्यकर्ते,पाटोदेकर मो.9075387638


## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.९ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ४०.५० क्विंटल | २,३०० | ३,११० | २,६९७ |
| ज्वारी/हायब्रिड :२.०० क्विंटल | २,९५० | २,९५० | २,९५० |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ५९.०० क्विंटल | ३,८२० | ७,००१ | ६,४४० |
| उडीद :२.०० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| बाजरी: २.०० क्विंटल | ३,१६० | ३,१६० | ३,१६० |
| मुग: १३.५० क्विंटल | ६,४१० | ७,७०२ | ६,९८७ |
| सोयाबीन: १०३.५० क्विंटल | ४,८६१ | ४,९०० | ४,८८७ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,०९० | ५,०९० | ५,०९० |

cmyk

## अग्रलेख

# तत्त्वशून्य हातमिळवणी...

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे काही घडते आहे त्यामुळे चांगल्या चांगल्यांना अवाक् केले आहे. बोलायचे काय किंवा बोलायचे तरी कशाला येथपर्यंत सगळ्या गोष्टी पोहोचल्या आहेत. देश आणि राज्यपातळीवर भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेस परस्परांचे कट्टर प्रतिस्पर्धी आहेत. तसाच असदुद्दीन ओवेसी यांचा एमआयम पक्षही भाजपला न चालणारा. कदाचित भाजपला पक्ष म्हणून एकवेळ चालेलही, मात्र भाजपच्या समर्थकांना ओवेसींच्या पक्षाशी केलेली जवळीक मान्य होणार नाही. समर्थक म्हणजे पक्षाचे नेते, पदाधिकारी अथवा कार्यकर्ते नाही तर पक्षाला विचारधारेच्या आधारावर मत देणारा मतदार.

तरीही राज्यात भाजपची दोन ठिकाणी या दोन पक्षांशी युती झाल्याच्या बातम्या पुढे आल्या. अल्पावधीसाठीच झालेली ही युती तुटल्याचे प्रथमदर्शनी दाखवले जात असले तरी प्रत्यक्षात तसे नाही आणि त्यातही भाजपने दुसरा मार्ग काढत आपला हेतू साध्य करून घेतला. हा हेतू म्हणजे अर्थातच त्या ठिकाणच्या सत्ताप्राप्तीचा. यावरून राजकारणात आता विचारधारेपेक्षा 'सत्ताकारण' महत्त्वाचे झाले असल्यावर शिक्कामोर्तब केले गेले.

अंबरनाथ आणि अकोट या दोन ठिकाणी ही विचित्र जुळणी झाली. अंबरनाथमध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला सर्वाधिक जागा मिळाल्या. त्यांना सत्तेबाहेर ठेवण्यासाठी भाजपने अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला सोबत घेतले. राज्याच्या सत्तेत हे तीनही पक्ष सहभागी असताना स्थानिक निवडणुकांमध्ये परस्परांच्या विरोधात लढत असल्यामुळे शिंदेंना स्पर्धक म्हणून शह देण्यासाठी भाजपने अन्य मित्र असलेल्या स्पर्धकाची मदत घेणे एकवेळ ठीक. तथापि, ज्या काँग्रेसमुक्त भारताचा पक्षाकडून नारा बुलंद केला जातो त्या काँग्रेसलाच सोबत घेत भाजपने शिंदेसेनेला शह दिला. काँग्रेसने भाजपच्या प्रेमात पडलेल्या १२ नगरसेवकांना नोटीस दिली आणि गंमतीची बाब म्हणजे नोटीस येताच काँग्रेसच्या नगरसेवकांनी चक्क भाजपात प्रवेश केला. भाजपला जे साध्य करायचे ते त्यांनी केलेच, त्यात मोठा पक्ष असूनही शिंदेसेनेला बाद केले आणि १२ जागा जिंकून आपली ताकद दाखवणाऱ्या काँग्रेसला मोडीतच काढले. हा पराभव शिंदे आणि काँग्रेसच्या जिव्हारी लागणे स्वाभाविक आहे. मात्र त्याहूनही अधिक कोणी यात अचंबित आणि नाउमेद झाले असतील ते मतदार ज्यांनी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी केले. या नगरसेवकांनी त्यांच्यावर मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाशी प्रातारणा केली. काँग्रेस आणि एमआयएमसोबत अशी स्थानिक पातळीवर आघाडी झाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कळल्यावर त्यांनी जाहीर नाराजी दर्शवली. ज्यांनी हे केले आहे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल असेही ते म्हणाले होते. त्यापुढे अकोटमध्ये काय झाले ते अद्याप समोर आले नसले तरी अंबरनाथमध्ये काँग्रेसच्या नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश करून स्वत:ला पावन करून घेतले.

जिल्हा परिषदा, नगरपालिका अथवा महापालिकांच्या निवडणुका अशा असतात की जेथे साधारणपणे स्थितीनुसार निर्णय घेण्याची सुट स्थानिक नेतृत्वाला दिली जाते. किमान असे पूर्वी म्हटले जायचे आणि तसे ते होतेही. आता त्यावर विश्वास ठेवण्याची कोणाची तयारी नाही. कारण ज्या प्रकारे राज्याचे नेतृत्व करणारे नेते आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असणारे नेते या स्थानिक निवडणुकांत आचरट प्रकार करत आहेत त्यावरून सत्ता संपादन हे त्यांचे एकमेव लक्ष्य असून स्थानिक नेत्यांना केवळ री ओढण्यासाठी ठेवले आहे. वर जो निर्णय घेतला जाईल त्याला केवळ मम म्हणायचे काम त्यांना ठेवले आहे. शिंदेसेनेने अंबरनाथ प्रकरणी नाराजी व्यक्त केली आहे. या पक्षात आणि भारतीय जनता पार्टीत कुरबुरी सुरू असल्याच्या बातम्या सरकार स्थापन झाल्याच्या दिवसापासून सुरू आहेत. अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील पत्रकार परिषदांमध्ये भाजपवर पूर्वी कधीही कोणी केली नव्हती एवढी प्रखर टीका भाजपच्या सोबत राहूनच केली आहे. याकडे ठरवून केलेले नाट्य म्हणून जरी पाहिले जात असले तरी त्यातून भ्रष्टाचाराचे जे आरोप केले गेले किंवा ज्या प्रकरणांमुळे निर्देश केला गेला ती प्रकरणे तर खोटी नाहीत. मतदारांना निवडणुकीच्या मोसमात त्याचे स्मरण करून देणे म्हणजे पाणी बरेच मुरते आहे. वास्तविक स्थानिकच्या निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच एकमेकाच्या स्थानिक नेत्यांना आपल्या कंपूत सामिल करून घेण्याची स्पर्धा शिगेला पोहोचली होती. नाराजी फारच वाढल्यावर आता परस्परांचे नेते आणि पदाधिकारी फोडायचे नाहीत असा करारही झाला. एवढे सगळे घडल्यावरही जनमताचा जो कौल आहे तो डावलण्याचा प्रकार सर्रास सुरू आहे. आघाडी अथवा युतीमधील पक्षांमध्ये मतभेद असोत वा मनभेद, त्यांना ते लखलाभ. आता त्याकडे सामान्य गोष्ट म्हणून दुर्लक्ष करण्याचीही सगळ्यांना सवय झाली आहे; पण आपल्याच मित्राच्या विरोधात आपल्या कट्टर विरोधकाशी हातमिळवणी करत मित्राला एका ठिकाणच्या सत्तेतून बेदखल करत दुसर्‍या ठिकाणी त्याच्यासोबत सत्ता उपभोगण्याचा प्रकार अचंबित करणारा आहे. राज्यातील राजकारण या थराला कधी गेले नव्हते. अशा प्रकारची तत्त्वशून्य हातमिळवणी ही केवळ परस्परांमधील विश्वासघाताचेच नाही तर मतदारांसोबतच्या विश्वासघाताचेही प्रतीक ठरते. मुळात कोणतीही वैचारिक समानता नसतानाही केली जाणारी हातमिळवणी हीच संधीसाधू या वर्गात मोडत असते. जेव्हा असे मतभेद आणि विचारधारेत साम्य नसलेले पक्ष एकत्र येतात तेव्हा ते कोणत्या प्रकारचे प्रशासन देऊ शकतात? ते किती काळ परस्परांच्या सोबत जाऊ शकतील आणि लोकांनाही न्याय देऊ शकतील?

## जलसंवर्धन करण्यासाठी युवकांनी वृक्षारोपण करावे –प्रा.डॉ.कल्पना घारगे



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी शिबिर बांगरवाडी येथे आयोजित करण्यात आले या शिबिराच्या पहिल्या बौद्धिक क्षेत्रात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आधी सभा सदस्य सौ प्राध्यापक डॉ कल्पना घारगे यांनी जलसंवर्धन आणि युवकांची भूमिका या विषयावर आपले मनोगत व्यक्त करताना युवकांनी जलसंवर्धन करण्यासाठी पावसाचे वाहून जाणारे पाणी जास्तीत जास्त जमिनीत मुरून जलसंवर्धन केले पाहिजे त्याचबरोबर जलसंवर्धन करण्यासाठी गावात जास्तीत जास्त वृक्षारोपण करावे अशी आव्हान त्यांनी केली या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांनीही मनोगत व्यक्त केले प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक आनंद भगत प्राध्यापक पापाजी चव्हाण डॉ नारायण फुने गावातील ज्येष्ठ नागरिक शेतकरी उमाजीराव काळे बंडोपंत काळे तात्याबा सस्ते व्यासपीठावर उपस्थित होते या कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक पापाजी चव्हाण यांनी केले तर आभार प्राध्यापक डॉ नारायण फुने यांनी मांडले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वयंसेवक पायल मुळे अरविंद सिंग टाक ईश्वर काळे शाळेचे मुख्याध्यापक श्री राख सर यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाधिकारी म्हणून प्राध्यापक बापू भोकसे व प्राध्यापक बी बी लोखंडे हे कार्यरत आहेत.

# नैसर्गिक अनुदान घोटाळ्यात फक्त तलाठीच आरोपी का?

## इतर सूत्रधार कोण? आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासावर प्रश्नचिन्ह

**जालना । प्रतिनिधी**

**जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. पण फक्त तलाठी आरोपी कसे इतर आरोपी कोण आहे याचा तपासणी आर्थिक गुन्हे शाखा करणार का यांप्रकरणी उच्चस्तरी चौकशी होणे गरजेचे आहे या घोटाळे प्रकरणी बरेच काही आरोपींची जामीन झालेली सह आरोपीचा तपास करणे गरजेचे आहे . घोटाळा प्रकरणी त्यामध्ये शासनाने वेळोवेळी ०४ जी आर काढुन बाधित शेतकऱ्यांना अनुदान जाहीर केले होते. त्यामध्ये अंबड व घनसावंगी तालुक्यात यादया अपलोडींगचे काम काज करणारे संबधत अधिकारी कर्मचारी यांनी मोठया प्रमाणावर बोगस (शेती नावावर नसलेले) नावे यादया मध्ये अपलोड करुन त्यांचे नावे आलेल्या शासनाचे अनुदानाची रक्कम त्यांचे कडुन परस्पर परत घेतल्या संबंधी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी सदर प्रकरणात सत्यता पडताळणी साठी चौकशी समीती गठीत केली होती.**

चौकशी समीतीने चौकशी करुन एकुण २४० गावामध्ये ₹२४,९०,७७,८११/- इतक्या शासकीय रकमेचा अपहार झाला असल्या बाबत अहवाल दिल्यानंतर सदर प्रकरणात पोलीस स्टेशन अंबड येथे गुन्हा रजि. क्र. ४५३/२०२५ कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८, ३(५) सह कलम ५२, ५३ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये गुन्हा




दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक साहेब जालना यांचे आदेशान्वये आर्थिक गुन्हे शाखा जालना करीत आहे. सदर गुन्हयात यापुर्वी १२ ( बारा ) आरोपीतांना अटक करण्यात आलेले आहे. सदर गुन्हयातील अटक आरोपी पवन सुलाने याचेकडे विचारपुस केली असता त्यास अनुदान याद्या तयार करतांना त्यास मदत करुन छ.संभाजीनगर जिल्ह्यातील व गंगापुर, खुलताबाद, फुलंब्री, वैजापुर, तालुक्यातील आपल्या नातलगांची नावे तलाठी पवन सुलाने यांना देऊन त्या माध्यमातुन लाखो रुपयांचे बोगस आनुदान तलाठयास मदत करणारा आरोपी नामे सुरेश गिरधार नागलोत वय ४४ वर्षे, रा. धनगरपिंपळगाव ता.अंबड जि. जालना याचा सक्रीय सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास मौजे धनगर पिंपळगाव येथुन सदर गुन्हात अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीसह एकुण १३ आरोपीतांना अटक करण्यात आर्थिक गुन्हे शाखेला यश आलेले असुन फरार आरोपीतांचा व त्यांचे एजंटचा शोध सुरू आहे.

## डॉ.जाधव यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

**पाटोदा । प्रतिनिधी**

**सामाजिक बांधिलकी जपत अत्यंत स्तुत्य अशा उपक्रमाने डॉ.प्रशांत यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. प्रियदर्शनी प्राथमिक शाळा पाटोदा येथे आयोजित या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम शुक्रवार, दिनांक ९ जानेवारी२०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.**

डॉ. प्रशांत जाधव हे भामेश्वर विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री. एल. आर. जाधव यांचे चिरंजीव असून, त्यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून समाजोपयोगी कार्य करण्याचा आदर्श उपक्रम राबविला. लहानग्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. या कार्यक्रमासाठी पाटोदा पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, पाटोदा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष राजू भैया जाधव, माजी नगरसेवक संदीप जाधव, पत्रकार पोपट कोल्हे ,विजय जाधव, सचिन गायकवाड, सतीष गर्जे, पवन भोकरे, रियाज शेख, दत्ता वाघमारे, जितेंद्र भोसले, आरसूळ भैय्या, जाधव सर यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पवन मोरे सर होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत नियोजनबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी मान्यवरांनी आपल्या भाषणातून सामाजिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत डॉ. प्रशांत जाधव यांच्या कार्याचे कौतुक केले. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप हे केवळ मदतीपुरते मर्यादित नसून, शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणारे असल्याचे मत नगराध्यक्ष राजुभैय्या जाधव यांनी व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण होते, तसेच समाजातही सकारात्मक संदेश जातो असे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या वतीने डॉ. प्रशांत जाधव यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. सामाजिक जाणीव ठेवून वाढदिवस साजरा करण्याची ही पद्धत इतरांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असे मत पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांनी व्यक्त केले. यावेळी सर्व पत्रकार यांचा लेखणी साहित्य देऊन सन्मान करण्यात आला.प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत झालेला हा कार्यक्रम सर्वांच्या स्मरणात राहणारा ठरला. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती शेलार मॅडम यांनी केले तथा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये शाळेतील शिक्षक श्री माताडे सर मदतनीस श्रीमती गायके मॅडम , श्रीमती लवांडे मॅडम यांनी सहकार्य केले तथा आभार प्रदर्शन श्रीमती वीर मॅडम यांनी केले यावेळी शाळेतील पालक वर्ग उपस्थित होता.

# शेतीला विश्व मानून विश्वनाथाची फलोत्पादनक्रांती

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

भारत देश हा कृषिप्रधान देश आहे.या देशातील माती-पाणी व निसर्ग एक अनमोल देणगी आहे.या देशातील अनेक युवक शेती व्यापार व उद्योगात रात्रंदिवस काम करतात. मराठवाड्यातील कमी पाणी असलेल्या पाटोदा तालुक्यात पिंपळवंडी येथील युवकाने आपल्या शेतीत फळबागेतून यश मिळविले आहे.आपले आई-वडील परमेश्वर जरे व कुटुंबाने शेतीसह गाय-म्हशींचा संभाळ करून शेतीत सर्वाधिक उत्पन्न घेतले.सर्वांनी शाकाहार व मेहनत घेऊन कुटुंबाला प्रगतीकडे घेऊन गेले.या मेहनतीचा आदर्श संस्कार घेऊन पदवीधर असलेल्या विश्वनाथ जरे या युवकाने पाटीलवस्ती येथील शेतात २००१ यावर्षी मेहनतीने सव्वा एकर मध्ये संत्रा बागेची लागवड केली.या बागेला उन्हाळ्यातच नांगरट केलेल्या जमिनीत शेणखत मिसळून जून महिन्यात संत्रा बागेची लागवड केली. या बागेला दरवर्षी खुरपणी,दशपर्णी अर्क फवारणी बांधबंधिस्ती करून शेतातील व बांधावरील पालापाचोळा बागेत कुजविला.यास्तव जमिनीची सुपीकता वाढली.कृषीसेवक गणेश दहिफळे,शेळके मामा यांच्या मार्गदर्शनानुसार वर्षभर पाणी दिले. कृषी तज्ञांच्या सल्ल्यानुसार पाणी व शेणखत देण्यात आले.या संत्रा बागेने चार वर्ष उन्हात घेतले.परंतु,तळपत्या उन्हात विश्वनाथाने मेहनत सोडली नाही.झाडांच्या मुळीचे व डेरदार संत्रीचे आरोग्य जपले.यावर्षी २०२५ रोजी संत्रा बागेचे फळ उत्पादन घेतले. ज्या उत्पादनात विश्वनाथ जरे यांना दिवाळी झाली की ६ लाख रुपयाचे उत्पन्न मिळाले.या उत्पन्नामुळे पाच वर्ष केलेले कष्ट कामी आले.गोड व मोठ्या आकाराचे संत्री फळ आल्याने त्यांचा आनंद वाढला.पिंपळवंडीतील या युवकांने संत्री फळ उत्पादन यशस्वी करून मेहनत हवामान व कृषीसल्ला घेऊन डोंगराळ भागात फलोत्पादन क्रांती केली आहे. विश्वनाथ जरे यांना आपल्या शेतीसाठी आई कांताबाई,बंधू विठ्ठल,अंबादास,वहिनी मीरा,सोनाली व चुलते-चुलत बंधूंचा आधार व मदत आहे.आपण यापुढेही आंबा,डाळिंब, केळी फळबागेसह गोसंवर्धनाचे काम करणार आहे.जागतिकीकरणाच्या या महत्त्वाच्या शेती उद्योगासाठी विश्वनाथ जरे यांना जिवलग मित्र श्रीकांत उकांडे,सलीम सय्यद,सूर्यकांत फुलमाळी,मेहुणे भैय्या चौधरी प्रगतशील शेतकरी भास्कर शिंदे, आदर्श गाव समिती सदस्य नरहरी वाघमारे,कारागीर संतोष वाघमारे यांचे मार्गदर्शन व मदत मिळत आहे.आजच्या युवकांनी शेती करीत असताना तणनियंत्रणासाठी प्रयत्न करावेत.शेतीमध्ये बांधबंधिस्ती केरकचरा कुजविणे शेणखत यांना मोठे महत्त्व आहे.याकरिता गाय-म्हैस-बैलांचा सांभाळ करणे गरजेचे आहे.शेतातील विहीर,नदी व बोअरचे पाणी,ठिबक व तुषार सिंचनाने वापरल्यास चांगले पीक येऊन वेळ व परिश्रम पाण्याची बचत होते.एकेकाळी देशाचे माजी कृषीमंत्री शरद पवार यांनी राष्ट्रीय फलोत्पादन योजनेतून अनेक शेतकऱ्यांना आधार दिला.त्या प्रेरणेतून महाराष्ट्रात फळबागा यशस्वी झाल्या.आजही युवकांनी व्यसनमुक्त राहून माती व पाण्याला महत्त्व देऊन फळबाग व गोपालनातून आपली प्रगती साधावी. ग्रामीण भागात शेती सोबत पर्यटन शाकाहारी हॉटेल,दूधबार व सेंद्रिय खत निर्मिती व्यवसायात रोजगाराच्या अनेक संधी आहेत.असा संदेश युवा शेतकरी,विश्वनाथ जरे सर्व युवक व महिला भगिनींना देत आहेत.



## आईच्या स्मरणार्थ वृक्षारोपणातून पर्यावरणपूरक संदेश

**आष्टी । प्रतिनिधी**

**बीड येथील पोलीस दलात दामिनी पथकात सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत असणाऱ्या मिरी रेडेकर यांच्या मातोश्री सुमनबाई महादेव रेडेकर यांचे शनिवार, दिनांक ३ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने रेडेकर कुटुंबावर शोककळा पसरली आहे.**



मातोश्रींच्या अंत्यविधीनंतरची राख नदीत विसर्जित न करता पर्यावरणाचे भान ठेवत, मिरी रेडेकर यांनी समाजापुढे एक आदर्श पायंडा पाडला आहे. त्यांनी आपल्या शेतात खड्डा करून त्या ठिकाणी अंत्यसंस्काराची राख ठेवत त्यावर वृक्षारोपण केले. आईच्या स्मृती जपण्यासाठी निसर्गाशी नाते जोडणारी ही कृती सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. आजच्या काळात धार्मिक विधी करताना पर्यावरण प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत असताना, रेडेकर कुटुंबाने घेतलेला हा निर्णय समाजाला सकारात्मक संदेश देणारा आहे. आईच्या आठवणी जपण्यासाठी वृक्षारोपणासारखा पर्यावरणपूरक मार्ग निवडत त्यांनी संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव दाखवून दिली आहे. मातोश्री सुमनबाई महादेव रेडेकर यांचा दशक्रिया विधी सोमवार, दिनांक १२ जानेवारी रोजी शेकापूर रस्ता, धबधबी जवळ संपन्न होणार आहे. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, अनेकांनी हा आदर्श इतरांनीही अंगीकारावा, अशी भावना व्यक्त केली आहे. हवे असल्यास अधिक भावनिक लेख छोटेखानी श्रद्धांजली

## पान १ वरून...

### दडपशाहीमुळे जनता

सत्तेत असणारे हे दोन्ही पक्ष ज्या पद्धतीने एकमेकांसोबत भांडत आहेत, त्यावरून सत्ता हीच त्यांच्यासाठी सर्वोच्च असल्याचे स्पष्ट होते. त्यांच्यात विचार कुठेच दिसत नाही. या निमित्ताने महाराष्ट्रातील जनतेला त्यांची विचित्र भूमिका बघायला मिळत आहे. निवडणुकीत पोलिस व गुंडांचा वापर केला जात आहे. हे पाहून जनता घाबरली आहे. भाजप हा स्वच्छ पक्ष आहे का? असा प्रश्न यामुळे उपस्थित होत आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले, महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात सध्या राग व संताप दिसत आहे. परंतु जनता हतबल आहे असेच म्हणावे लागेल. कारण हे सरकार यंत्रणा, निवडणूक आयोग, पोलिस व गुंडांचा वापर करून चालवले जात आहे. तिन्ही पक्षांनी गुंडांचा आश्रय घेतल्यामुळे जनता दहशतीखाली जगत आहे. अन्यथा रस्त्यावर फिरू देणार नाही अशी अवस्था या महाराष्ट्रात दिसली असती, असे ते म्हणाले.

-----------

### खासगी कोचिंग वर्गांवर

याचिकेत स्पर्धा परीक्षा, शिकवणी वर्ग, दीर्घ तासांचे वर्ग, सततच्या चाचण्या, निकालांची सार्वजनिक तुलना आणि यशाची हमी देणाऱ्या जाहिरातींमुळे विद्यार्थ्यांवर असह्य मानसिक दबाव निर्माण होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. या प्रकरणावर २५ जुलै २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने आदेश देताना देशभरातील शाळा व खासगी शिकवणी वर्गामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्यासाठी राज्य सरकारांनी ठोस मार्गदर्शक सूचना तयार कराव्यात, तसेच विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, असे स्पष्ट निर्देश दिले होते. त्याच आदेशाच्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाने हा शासन निर्णय जारी केला असून, शिक्षणाच्या नावाखाली होणाऱ्या अति-दबावावर आता प्रशासकीय पातळीवर नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया आता समितीच्या माध्यमातून केली जाणार आहे.

-----------

### राज्यात 'आरटीई' प्रवेशांची

२५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशित विद्यार्थ्यांचे शुल्क शिक्षण विभागाकडून शाळांना देण्यात येते. त्यामुळे पालकांचा आरटीई प्रवेशांकडे ओढा असतो. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली होती, त्यामुळे सर्वाधिक ८८ हजारांहून अधिक प्रवेश झाले. या पार्श्वभूमीवर, आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयाने राज्य शासनाला प्रस्ताव पाठवूनही मान्यतेअभावी आरटीई प्रवेश प्रक्रिया रखडली होती. गोसावी यांनी परिपत्रकाद्वारे दिलेल्या सूचनांनुसार, विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित शाळांची नोंदणी आणि पडताळणीसाठीचे आरटीईचे संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे.

-----------

### परळीत एमआयएम शिंदे, अजित

फडणवीस यांनी यावरून नाराजी व्यक्त करत हे शक्य नसल्याचे स्पष्टपणे सांगितले. परळीमध्ये नगरपरिषद निवडणुकीनंतर आता नवीन समीकरणे पहायला मिळत आहेत. त्याचे कारण म्हणजे अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गटाने चक्क ऑल इंडिया इत्तेहादूल मुस्लिमीन (एआयएमआयएम) शी गटनेता निवडीत युती केली आहे. खरंतर नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व मित्र पक्षाच्या गटात मंत्री पंकजा मुंडे माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आक्षेपार्ह आरोप करत निवडून आलेल्या एमआयएमच्या सदस्याचा समावेश करण्यात आला आहे. परळी नगरपरिषद पदाधिकारी निवड बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, मित्रपक्ष, अपक्ष २ अशा २४ जणांचा समावेश आहे. तसेच या मित्र पक्षांमध्ये एमआयएमच्या नगरसेविका शेख आयशा मोहसीन यांचाही समावेश आहे. तर बीड पालिकेत देखील एमआयएमचा एक सदस्य आहे त्यांचा अद्याप निर्णय झाला नसला तरी ते सत्तेत सहभागी होतील आणि जे परळीत तेच बीड मध्ये पहावयास मिळेल असे बोलले जात आहे.

---------------

### दुचाकी-कार अपघातात

या घटनेमुळे आनंदवाडी गावात शोककळा पसरली असून शुक्रवारी चूल पेटली नाही. गंगाखेड तालुक्यातील आनंदवाडी गावचे तीन मित्र मोटारसायकलवरून (दुचाकी क्र. एमएच २४ बिई २९४०) किनगाव येथील उरूसाला गेले होते. या उरसावरून गावाकडे परत येत असताना लातूर जिल्ह्यातील किनगाव ते अंबाजोगाई या रस्त्यावर रात्री ११.३०च्या सुमारास त्यांच्या दुचाकीला स्विफ्ट कारने (क्र. एमएच ४६ ए.डी. ५८५४) जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील आनंदवाडी येथील संदिप बिभीषण चाटे (३२), विठ्ठल व्यंकटराव चाटे हे दोघे जागीर ठार झाले. गंभीर जखमी असलेल्या अजय चंद्रकांत दराडे यांचा अंबाजोगाई येथील शासकीय रूग्णालयात उपचार सुरू असताना शुक्रवारी पहाटे मृत्यू झाला.

-------- ---------

### राज ठाकरे इतिहासातील सर्वात मोठ्या

ठाकरे यांच्या एकत्र येण्याविषयी विचारणा करण्यात आली, यावेळी फडणवीस म्हणाले की, जन्मामुळे मालमत्ता मिळू शकते, मात्र विचारांचा वारसा मिळत नाही. या दोघांनाही विचारांचा वारसा मिळालेला नाही. राज व उद्धव ठाकरे एकत्र येत आहेत, त्याला काहिही अर्थ राहिलेला नाही. कदाचित २००९ मध्ये हे दोघे एकत्र आले असते, तर आजची राजकिय परिस्थिती वेगळी पहायला मिळाली असती. त्या काळात त्यांना मते देखील भरपूर मिळाली असती, असे देखील फडणवीस म्हणाले. फडणवीस बोलताना पुढे म्हणाले की, मी स्पष्ट शब्दांमध्ये सांगतो, या युतीमध्ये राज ठाकरेंना काहीही फायदा होणार नाही. राज ठाकरेंचा उद्धव ठाकरेंना फायदा होईल, मात्र उद्धव ठाकरेंचा राज ठाकरेंना फायदा होणार नाही. राज ठाकरे हे पराभूत होणार आहे, ते ही मोठ्या फरकाने, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

-----------

### राज्यात हाडं गोठवणारी थंडी

आणि गारठा नागरिकांना जाणवेल. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतही अशीच हवामानस्थिती राहण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. पश्चिम महाराष्ट्रात थंडीचा प्रभाव तुलनेने अधिक जाणवणार आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर परिसरात पहाटे गारवा जाणवेल. दुपारी सूर्यप्रकाशामुळे तापमानात थोडी वाढ होईल, मात्र रात्री पुन्हा थंडी वाढेल. उत्तर महाराष्ट्र, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहमदनगर भागांत किमान तापमान १० ते १३ अंशांपर्यंत घसरण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, नांदेड आणि परभणी जिल्ह्यांत कोरडे हवामान राहील, मात्र सकाळी धुके आणि रात्री गारठा जाणवेल. विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला, वर्धा आणि चंद्रपूर परिसरात किमान तापमान १० अंशांच्या आसपास राहण्याची शक्यता असून, थंडीचा जोर कायम राहणार आहे. पुढील काही दिवस राज्यातील हवामानात फारसा मोठा बदल होणार नाही, असा अंदाज आहे. सकाळी धुके, रात्री गारवा आणि दिवसा हलका उबदारपणा अशीच स्थिती राहणार आहे. मुंबई-पुण्यासह बहुतांश भागांत थंडीचा प्रभाव टिकून राहील, मात्र अचानक तापमानात मोठी घसरण होण्याची शक्यता कमी वर्तवली जात आहे.

----------

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. १० जानेवारी २०२६
३

## थोडक्यात

### युसूफवडगाव विद्यालयाचे इंग्लिश ओलिंपियाड स्पर्धा परीक्षेमध्ये घवघवीत यश

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील युसूफवडगांव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयामधील विद्यार्थ्यांनी नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल इंग्लिश ओलंपियाड स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.



नुकताच काही दिवसापुर्वी झालेल्या इंटरनॅशनल इंग्लिश ओलंपियाड स्पर्धा परिक्षेचा निकाल जाहीर झाला असुन यामध्ये युसूफवडगांव विद्यालयातील इयत्ता दहावी मधून चि.सावंत श्रीराम रमेश याने प्रथम क्रमांकासह गोल्ड मेडल पटकावले आहे.तसेच इयत्ता बारावी विज्ञान मधून कु.यादव प्रतीक्षा रामचंद्र,जाधव ज्ञानेश्वरी पांडुरंग,शिंदे दिशा गोविंद,पवार अमृता प्रकाश,इंगळे समृद्धी जीवनराव,गिरी सोनाक्षी गणेश,गायकवाड श्वेता चंद्रकांत,खरबड आरती हनुमंत या विद्यार्थिनींनी सुद्धा प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक पटकावले असून त्यांनी सुद्धा गोल्ड मेडल संपादन केले आहे.त्यासोबत या सर्व विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल आणि ॲप्रिसिएशन प्रमाणपत्र सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत मिळणार असून या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थासचिव दीपक घुमरे,संस्थाध्यक्ष सुकाळे यु.बी, प्राचार्य भोसले ए. यु,उच्च माध्यमिक विभाग प्रमुख चव्हाण एन.एन व सर्व प्राध्यापक,शिक्षक,पालक,नागरिकांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

### मालतीबाई देशमुख यांचे निधन

**माजलगाव । प्रतिनिधी**



शहरातील सन्मित्र कॉलनी येथील रहिवाशी असलेल्या मालती मधुकर देशमुख (परडीकर) वय (७८ वर्ष) यांचे शुक्रवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगलनाथ स्मशानभूमी मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे पश्चात दोन मुले, एक मुलगी,सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील प्रगतशील शेतकरी मुकुंद व अभियंता मनोज परडीकर यांच्या त्या आई होत.

### भविष्यातील सुखी व समृद्ध जीवनाची सोय म्हणजे विमा – सुशील उजगरे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

भविष्यातील सुखी व समृद्ध जीवनाची सोय म्हणजे विमा गुंतवणूक होय तसेच निवृत्तीनंतर अथवा उतार वयात आर्थिक विवंचनेतून मुक्तता मिळण्यासाठी बँकांकडून ग्राहकाला दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये म्युच्युअल फंड व विम्यातून आर्थिक संपन्नता लाभते असे प्रतिपादन स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक श्री. सुशील उजगरे यांनी केले. ते मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये आर्थिक साक्षरता या विषयावर आयोजित मार्गदर्शनपर व्याख्यानमध्ये उपस्थितांशी संवाद साधताना म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे हे होते. त्यांनी आपण आपल्या आवडीच्या योजनेमध्ये गुंतवणूक करून जीवन आनंदी व स्वयंपूर्ण होण्यासाठी विमा गुंतवणूक करावी असे सांगितले. यावेळी डॉ. इंद्रजीत भगत यांनी महाविद्यालयामध्ये आयोजित राष्ट्रीय परिषदेसाठी सामाजिक दायित्व म्हणून प्रायोजकत्व स्वीकारण्यासाठी आवाहन केले. यासंबंधी प्राचार्यांच्या हस्ते शाखा व्यवस्थापकांना पत्र दिले. यावेळी बँकेचे श्री. अभिजीत माळी यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना बँकेच्या इतरही सेवा व सुविधांची सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी केले. तर आभार डॉ. इंद्रजीत भगत यांनी मानले.

# बीडमध्ये गोडाऊनला आग

## आ. विजयसिंह पंडित यांनी केली पाहणी; अग्नीशामक दलाच्या गाड्या नादुरुस्त असल्याची गंभीर बाब समोर येताच दुरुस्तीच्या सुचना देत दोन नव्या गाड्या घेण्याचा घेतला मोठा निर्णय



बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सहयोग नगर भागातील गोडाऊनला आज सकाळी आग लागली, या ठिकाणाची बीड राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ. विजयसिंह पंडित यांनी पाहणी केली, यावेळी अग्नीशामक दलाच्या गाड्या नादुरुस्त असल्याची गंभीर बाब समोर येताच त्यांनी दुरुस्तीच्या सुचना देत दोन नव्या गाड्या घेण्याचा निर्णय घेतला आहे.

गेल्या अनेक दिवसापासून बीड नगरपालिकेच्या अग्निशामक दलातील गाड्या नादुरुस्त असल्याची गंभीर बाब यावेळी समोर आली. महत्त्वाच्या वेळी अग्निशामक दलाच्या गाड्या सज्ज असणे आवश्यक असताना गेल्या अनेक दिवसापासून याकडे येथील पालिका प्रशासन व सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष केले असल्याचे दिसून आले. या घटनेचा पंचनामा करण्याच्या सूचना यावेळी संबंधित प्रशासनाला आ. विजयसिंह पंडित यांच्याकडून देण्यात आल्या. बीड नगर परिषदेच्या अग्निशामक दलाकडे चार अग्निशामक गाड्या आहेत त्या तात्काळ दुरुस्त करून सेवेत दाखल करण्याच्या सूचना त्यांनी पालिका प्रशासनाला यावेळी दिल्या.

राज्याचे विकासभिमुख उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातून जिल्हा वार्षिक योजनेतून नवीन अग्निशामक दलाच्या दोन गाड्या घेण्याचा निर्णय घेतलेला असून त्या लवकरच बीड करांच्या सेवेत दाखल होतील.यावेळी माजी नगरसेवक इकबाल शेख, नगरसेवक महेश धांडे, महेश राऊत, संतोष जाधव यांच्यासह या भागातील नागरिकांची उपस्थिती होती. सदर आग लागल्यानंतर आग विझवण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्या टीम मधील कार्यकर्त्यांनी व स्थानिक नागरिकांनी परिश्रम घेतले.



## आष्टी ग्रामीण रुग्णालयात दुर्बिणीद्वारे गर्भपिशवी शस्त्रक्रियेची ऐतिहासिक सुरुवात

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण रुग्णालयात आता आधुनिक वैद्यकीय सुविधांचा नवा अध्याय सुरू झाला असून, दुर्बिणीद्वारे (लॅप्रोस्कोपी) गर्भाशयातील पिशवीचे निदान व शस्त्रक्रिया करण्यास सुरुवात झाली आहे. या सुविधेअंतर्गत पहिल्या रुग्णावर बुधवार, दि. ७ रोजी यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली, अशी माहिती ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे यांनी दिली.



आष्टी ग्रामीण रुग्णालयात येथून पुढे टप्प्याटप्प्याने सर्व अद्ययावत वैद्यकीय सुविधा सुरू करण्यात येणार असून, तालुक्यात पहिल्यांदाच ग्रामीण रुग्णालयात दुर्बिणीद्वारे गर्भाशयातील पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली आहे.या शस्त्रक्रियेचा लाभ तालुक्यातील ब्रम्हगाव येथील आशा पिंगळे (वय ४० वर्षे) या महिलेला झाला.सदर शस्त्रक्रिया वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रकाश आघाव यांनी यशस्वीपणे पार पाडली. यावेळी ग्रामीण रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

**ग्रामीण महिलांसाठी मोठा दिलासा**

या अत्याधुनिक सुविधेमुळे आता ग्रामीण भागातील महिलांना मोठ्या शहरात किंवा खासगी रुग्णालयात जाण्याची गरज भासणार नाही, तसेच आर्थिक खर्चातही मोठी बचत होणार आहे. आष्टी ग्रामीण रुग्णालयाच्या या यशामुळे तालुक्यातील आरोग्यसेवेला नवी दिशा मिळाली आहे.

## शाश्वत विकासासाठी पाणलोट क्षेत्र विकास गावकऱ्यांनी करावा –प्राचार्य कदम

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विशेष हिवाळी शिबिराची आयोजन करण्यात आले या शिबिराचे उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ विश्वास कदम शिबिराची अध्यक्ष प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे प्रमुख पाहुणे म्हणून सभापती हनुमंत काळे प्रमुख पाहुणे म्हणून झुंजार नेता चे पत्रकार विजय जाधव प्रा सुनील जाधव प्रा ज्योती रकटे शाळेचे मुख्याध्यापक राख सर पा प्रवीण शिलेदार व्यासपीठावर उपस्थित होते सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य विश्वास कदम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मराठवाडा हा दुष्काळी भाग या भागात पावसाचे प्रमाण अत्यल्प असून पर्यावरण संवर्धनासाठी व जलसंवर्धनासाठी शाश्वत विकास करण्यासाठी आपण पाणलोट क्षेत्र विकास केला पाहिजे व आपल्या गाव शाश्वत केले पाहिजे अशी आव्हान गावकरी व युवकांना केली या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ सुनील जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना गावकऱ्यांनी या शिबिरात सहभागी होऊन आपल्या गावाचे पर्यावरण व जल व्यवस्थापन करावे अशी आवाहन केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ बी बी लोखंडे यांनी केले आभार प्रा बापू घोक्षे यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक पापाजी चव्हाण डॉ नारायण फुने प्राध्यापक केशव सुर्वे प्राध्यापक गोपाळ धांडे यांनी सहकार्य केले राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कुमारी पायल मुळेअजय मुळीक व शिंदे हरविंद सिंह टाक ईश्वर काळे या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.



## महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट क संयुक्त पूर्व परीक्षा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट क संयुक्त पूर्व परीक्षा–२०२५ दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकुण १२ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते १२.०० या कालावधीत घेण्यात येणार आहे.

सदर परीक्षेसाठी एकूण २८५० उमेदवार बसलेले असून सदर परिक्षा सुरळीत पार पाडणेकरीता १२ उपकेंद्रप्रमुख, १२ मदतनीस, ४८ पर्यवेक्षक, १४६ समवेक्षक असे एकूण २१८ अधिकारी/ कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाव्दारे नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना दिनांक ०६.०१.२०२६ रोजी जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी बीड तथा जिल्हा केंद्राप्रमुख यांनी सदर परिक्षेचे अनुषंगाने प्रशिक्षण दिले.

परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणाताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परीसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.

आयोगाच्या सूचनेनुसार सदर परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांचेकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू व अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाता येणार नाही. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा / अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन येण्यास परवानगी देण्यात येत आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेले परीक्षेचे केवळ आवश्यक साहित्य उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील, तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्रासोबतच त्यांचे स्वतः चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हींग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणतेही एक ओळखपत्र व त्याची एक छायांकित प्रत सोबत आणने आवश्यक आहे.

उमेदवारांना त्यांचे परीक्षा उपकेंद्रावर सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहणेबाबत याव्दारे सूचित करण्यात आले आहे. सकाळी १०.३० वाजे नंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

## स्त्री-पुरूष समानतेचे मुल्य प्रत्येक कुटुंबात रूजले पाहिजे- डॉ.राजेश इंगोले

### मानवलोक संचलित मनस्विनी महिला प्रकल्पामध्ये जिल्हास्तरीय सामाजिक समानता मेळाव्याचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून महिला आणि युवती तसेच युवक आणि पुरूष यांचे सामाजिक समानता मेळावे मनस्वीनी महिला प्रकल्पामध्ये आयोजित करण्यात आले होते.

यावेळी युवक व पुरूषांच्या मेळाव्यास अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा व्याख्याता डॉ.राजेश इंगोले तर युवती व महिलांच्या मेळाव्यास स्त्री मुक्ती परिषदेच्या कार्यकर्त्या अलका पावनगडकर व मराठी अभिनेत्री समता जाधव या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी बोलताना प्रमुख व्याख्याता डॉ.राजेश इंगोले यांनी अनेक महापुरूषांचे दाखले देत या महापुरूषांनी स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी व अंधश्रद्धेच्या जीवनातून मुक्त करून त्यांना सामाजिक समानतेच्या प्रवाहात आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न केल्याचे उदाहरणांसह स्पष्ट केले. भगवान तथागत गौतम बुद्ध, जगद्गुरू संत तुकाराम, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना परंपरावादी हाल अपेष्टांतून बाहेर काढून त्यांच्या जीवनाला एक नवी दिशा दिली. ज्या काळामध्ये स्त्रीला चूल आणि मूल याच दोन गोष्टींत अडकवून स्त्री ही फक्त उपभोगाची वस्तू आहे असे मानले जात होते. त्या काळात या महापुरूषांनी स्त्री मुक्तीचा लढा उभारला आणि आज भारतामध्ये स्त्रियांना शैक्षणिक सांस्कृतिक




सामाजिक समानता मिळाली. त्यामध्ये या महापुरूषांचा वाटा मोलाचा आहे असे आजच्या परिस्थितीमध्ये आपण पाहत आहोत, स्त्री शिकली असली तरी सुद्धा आजी बहुसंख्य वर्गामध्ये बालविवाह सर्रास होताना दिसत आहेत. हुंडा देणे घेणे ही प्रथा सुरू आहे. हुंडाबळींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. स्त्रियांवर होणारे बलात्कार, अन्याय अत्याचार यांचे प्रमाण वाढत आहे. मग खऱ्या अर्थाने हीच सामाजिक समानता म्हणायची का..? असा प्रश्न डॉ.इंगोले यांनी उपस्थित केला. स्त्री–पुरूष समानता जर खऱ्या अर्थाने आणायचे असेल समाजातील रूजलेली पुरूषप्रधान मानसिकता बदलवून तर प्रत्येक कुटुंबाने स्त्री आणि पुरूष समानतेचे मूल्य आपल्या कौटुंबिक संस्कारांमध्ये रूजविले पाहिजे आणि आपल्या स्वतःपासून याची सुरूवात केली तरच सामाजिक समानता स्त्री पुरूष समानता प्रस्थापित होईल अशी अपेक्षा डॉ.इंगोले यांनी व्यक्त केली. अलका पावनगडकर व मराठी अभिनेत्री समता जाधव यांनी स्त्री–पुरूष समानता सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्य यावर भर देत मुली महिलांशी मुक्तपणे संवाद साधला. वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांनी पुरूषप्रधान मानसिकता आणि व्यसनाधीनता यावर मौलिक मार्गदर्शन केले. याप्रसंगी मागील चार वर्षांपासून ज्या गावपातळीवरील प्रेरक व प्रेरिकांनी गाव पातळीवरील कौटुंबिक हिंसा तसेच बालविवाह रोखण्यासाठी भरीव कामगिरी केली त्यांचा सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. बीड जिल्ह्यामध्ये गेल्या दशकापासून बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार आणि हुंडा प्रथा हे विषय घेऊन मनस्विनी महिला प्रकल्प गाव पातळीवर स्त्री–पुरूष व युवक युवती यांच्यामध्ये जनजागृतीचे काम करीत आहे. आत्तापर्यंत गेल्या तीन वर्षांत होणारे ३५० बालविवाह, पालकांशी संवाद साधून तर कधी १०९८ ची मदत घेऊन रोखले आहेत. निर्धार समानता या प्रकारच्या अनुषंगाने अंबाजोगाई व धारूर तालुक्यातील स्त्रिया व पुरूष यांच्याशी सातत्याने संवाद करणे गांव पातळीवरील बाल संरक्षण समिती याच्या क्षमता वाढविणे, लोकांमध्ये जनजागृती करणे व महिलांना सन्मान आणि रोजगार मिळावा यासाठी प्रयत्न केला जात आहे. या दोन्ही मेळाव्यास प्रत्येकी ३०० व ३५० एवढे प्रतिनिधी हजर होते. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी प्रा.अरूंधती पाटील यांनी मार्गदर्शन केले. तर मनस्वीनीचे प्रकल्प समन्वयक राहुल निपटे यांचे योग्य नियोजन व व्यवस्थापन तसेच इतर कार्यकर्त्यांचे सहकार्य यामुळे हा मेळावा यशस्वी झाला.

## पान ६ वरुन...

### फडात उभ्या ट्रकला आग

चालकाने गाडी सुरू करण्यासाठी 'सेल्फ' मारला असता, बॅटरीमध्ये अचानक स्पार्किंग होऊन ठिणग्या उडाल्या. या ठिणग्यांमुळे आगीचा भडका उडाला. आगीने रौद्र रूप धारण केल्यामुळे ऊस भरण्यासाठी उभा असलेला ट्रक आणि शेतातील उभा ऊस आगीच्या विळख्यात सापडला. या दुर्घटनेत ट्रकचे आणि शेतातील पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. भर दुपारी घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. तोडणीला आलेला ऊस डोळ्यादेखत जळून खाक झाल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केले, मात्र आगीची तीव्रता अधिक असल्याने मोठे नुकसान टाळता आले नाही. महसूल विभागाकडून या नुकसानीचा तातडीने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### राजमाता जिजाऊ यांच्या

त्यांनी दिल्या. याच भागात असलेल्या माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याच्या परिसरातही डॉ.क्षीरसागर यांनी भेट दिली. त्या परिसराची दुरुस्ती व स्वच्छता करण्याबाबत नगरपरिषद प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी उप मुख्याधिकारी सम्राट कदम, दुधाळ, नगरसेवक शुभम धुत, माजी नगरसेवक रवींद्र कदम, नगरसेवक नागेश तांबारे, मंगेश धोंगडे, राकेश जाधव, सनी माने, राजेश पिंगळे, राजेश भुसारी, माणिक वाघमारे, दत्ता गायकवाड, कुटे यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### स्व.गणेश डोंगरे कुटुंबाच्या

पोहोचविण्यात आली. या मदतीच्या वेळी गणेश डोंगरे यांच्या पत्नी अश्विनी डोंगरे यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. अचानक कुटुंबाचा कर्ता पुरुष गेल्याने उघड्यावर पडलेल्या या कुटुंबाला मिळालेला हा आधार त्यांच्या दुःखात काहीसा दिलासा देणारा ठरला. पंकजाताई मुंडे यांच्या संवेदनशील भूमिकेमुळे आणि तातडीच्या मदतीमुळे डोंगरे कुटुंबाला मानसिक बळ मिळाले आहे. भाजपाचे माजी आमदार केशवराव आंधळे, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार संघटनेचे नेते कृष्णा तिडके, जेष्ठ नेते सोमनाथ बडे, उपनगराध्यक्ष बनसीधर मुंडे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, बाबा मुंडे, माजी सरपंच सुग्रीव तिडके, आंधळे, ह.भ.प. विठ्ठल महाराज शास्त्री, सतिश बप्पा बडे, रणजित धस, श्रीमंत मुंडे, सचिन अवचर यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

### दहशतवाद विरोधी पथकाची

डीड नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे करणे आवश्यक आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडूनही वरील ट्रस्टची माहिती घेतली असता त्यांच्याकडे नोंदणी नसल्याचे कळवले आहे, असे तक्रारीत करण्यात आले आहे.

गुलजार ए रझा या नावाच्या ट्रस्टच्या पदधिकाऱ्यां विरोधात गुन्हा दाखल

दहशतवाद विरोधी पथकाने माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात ज्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल आहे तो इम्रान शेख हा गुलजार ए रझा ट्रस्टचा अध्यक्ष, सय्यद मुज्जम्मिल हा उपाध्यक्ष, असमदुद्दीन कैसर काझी हा सचिव तर तौफीक काझी याचा विश्वस्त म्हणून बँकेच्या खात्यांमध्ये नोंदणी असल्याची माहिती तपासात पुढे आली आहे.

### आष्टी बस स्थानकात

केला जात आहे. प्रवासी व स्थानिक नागरिकांनी तात्काळ बस स्थानक परिसराची स्वच्छता, नियमित पाणी फवारणी, कचरा उचल व आरोग्यदृष्ट्या आवश्यक उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे. अन्यथा याबाबत आंदोलन करण्याचा इशाराही नागरिकांकडून देण्यात येत आहे.

### नागरिकांची तत्परता व

दाखल होत गाईवर उपचार सुरू केले. त्यांच्या योग्य आणि वेळेवर केलेल्या वैद्यकीय उपचारांमुळे गाईचे प्राण वाचले. या संपूर्ण बचावकार्यामध्ये कृषी अधिकारी गोरख तरटे, अजित मुळे, रत्नदीप निकाळजे व सचिन रानडे वर्धन भोसले यांनीही डॉक्टरांना आवश्यक ती मदत करत मोलाचे सहकार्य केले. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नामुळे एका मुक्या जीवाचा प्राण वाचला असून परिसरात मानवी संवेदनशीलतेचे आणि सेवाभावाचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे.

### जन्म-मृत्यू प्रमाणपत्र

पुढील सुनावणी ३ फेब्रुवारी २०२६ रोजी ठेवण्यात आली आहे.जन्म प्रमाणपत्र हे शाळा प्रवेश, शासकीय नोकरी, पासपोर्ट, आधार आदींसाठी अत्यावश्यक असताना, राजकीय दबावाखाली प्रशासनाने कारवाई केल्याचा आरोपही याचिकेत करण्यात आला आहे.हा लढा केवळ कागदपत्रांचा नाही, तर सामान्य माणसाच्या सन्मानाचा आहे, असे सांगत सय्यद एजाज यांनी पीडितांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा निर्धार व्यक्त केला. न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे प्रशासनाच्या मनमानीला लगाम बसणार, अशी आशा नागरिकांत व्यक्त होत आहे.या प्रकरणात याचिकाकर्ते अँड.काझी मुखीमोद्दीन सैदोद्दीन व शेख इरफाना इस्माईल यांनी शासन निर्णय दि. १२ मार्च २०२५, शासनाचे पत्र दि. १७ मार्च २०२५ तसेच तहसीलदार गेवराई यांचा सर्व प्रमाणपत्रे रद्द करण्याचा आदेश असंवैधानिक असल्याचा दावा केला आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध विधीज्ञ अँड.श्री.सुदर्शन साळुंके व अँड. श्री.महेंद्र पंडीतराव गंडले यांनी कायदाच्या तरतुदीचा गाढा अभ्यास करून भक्कमपणे बाजू मांडुन त्यांनी युक्तिवाद केला सदरील याचिकाकडे संपुर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून होते. यावेळी अँड .सोमेश्वर मुंडिक व अँड .सिद्धार्थ पाईकराव यांनी सहकार्य केले.

### जिनिंग व सोयाबीन खरेदी

यावेळी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोकराव येडे, डॉ. गणेश ढवळे, कुलदीप करपे, गणेश नाईकवाडे, सुहास जायभाय, राजू गायके, प्राचार्य राजकुमार कदम, डी. जी. तांदळे, रामधन जमाले, ज्योतीराम हरकुडे, बाळासाहेब मोरे, अर्जुन सोनवणे, राज वीर, लहू गायकवाड पाटील, बाजीराव ढाकणे, सुदाम तांदळे आदी उपस्थित होते.

### दु:खावर फुंकर घालणारी

बांधवांनी सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविला. या मदत फेरीत सामाजिक कार्यकर्त्यांचाही सक्रीय सहभाग लाभला. या संवेदनशील आणि कृतिशील उपक्रमामुळे पत्रकारिता ही केवळ शब्दांची नसून, गरजेच्या वेळी धावून येणारी माणुसकी असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. पत्रकारांच्या या आदर्श भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत असून, अजूनही माणुसकी जिवंत आहे याची प्रचिती समाजाला मिळाली आहे.

### गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी

घडवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून योग्य मार्गाकडे लक्ष केंद्रीत करणे महत्वाचे आहे. आपल्या आई–वडीलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण उच्च शिक्षणाची वाट धरली आहे. यातून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्याला जमेल तो विषय आत्मसात करून पुढे जाण्याचा प्रयत्न करावा. अडचणी आणि अडथळे हे येतच असतात, जिद्द आणि इच्छा असेल तर यावरही मात करता येते. अनेक नव नवीन शोध लागू लागले आहेत. नवे प्रयोग पुढे येऊ लागले आहेत याचा अभ्यास करून विद्यार्थ्यांनी पुढे जाणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. यावेळी दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक वृंद, कर्मचारी उपस्थित होते.

# शक्तिपीठ महामार्गात आता महत्वाचा बदल; जिल्हे तेच मात्र काही तालुके बदलले

मुंबई : रस्तावित शक्तिपीठ महामार्ग सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचा महामार्ग आहे. काही लोकांनी त्याला विरोध केला असला तरी आम्ही या मार्गाचा नवा प्लॅन तयार केला असून, तो कमीत कमी बागायती शेतीमधून जाणारा असेल असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. महापालिका निवडणुकीनंतर कोल्हापूरच्या हद्दवाढीबाबत आम्ही आवाहन करणार असून कोल्हापूरकर त्याला प्रतिसाद देतील, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचा महामार्ग आहे हे मी सुरुवातीला समजावून सांगत होतो. त्यावेळी काही शेतकऱ्यांनी त्याला विरोध केला. त्यावेळी ज्या शेतकऱ्यांना समजले होते ते आमच्यासोबत होते. आता सर्वांच्या ते लक्षात आले असून आम्ही त्याचा नवा मार्ग तयार केला आहे. नवीन मार्ग कुणी विरोध केला म्हणून तयार केलेला नाही. नवीन ग्रीनफील्ड महामार्ग तयार करताना नवीन एरिया ओपन व्हावेत हा उद्देश आहे. रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्ग व शक्तिपीठ हे दोन्ही मार्ग समांतर होत होते. त्याचा दोन्ही महामार्गाच्या वाहतुकीवर परिणाम झाला असता.

यामुळे नवीन परिसराचा यात समावेश होत नव्हता. म्हणून आम्ही नवीन परिसराचा समावेश असणारा मार्ग तयार केला. यात कमीत कमी बागायती शेती, कमीत कमी जंगल परिसर येईल, या प्लॅननुसार आम्ही शक्तिपीठ महामार्ग नेणार आहोत.

यात जिल्हे तेच आहेत, कोणताही जिल्हा बदललेला नाही. काही तालुके व परिसर बदलला आहे. या नवीन प्लॅननुसारच शक्तिपीठ होणार असून यात कोणताही बदल होणार नाही, अशी भूमिकाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडली.

# अपार कष्टातून घामाचे झाले मोती!

## केतन सतीश शिंदे यांची यशोगाथा; ग्लोबलच्या केळीची विदेशात निर्यात



परळी। प्रतिनिधी

जिद्द, कसोटी आणि नवे बदल स्विकारण्याची तयारी असेल तर यश हमखास मिळते आणि त्यातूनच केलेल्या कष्टाचे चीज होते. याचा अनेक उदाहरणातून अनेकांना प्रत्यय आलेला आहे. अशीच यशोगाथा युसुफ वडगाव (सादोळा) येथील शेतकऱ्यांची आहे. ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून येथील शेतकरी केतन सतिश शिंदे यांना अल्प दरात केळीची रोपे देण्यात आली, लागवडीपासून वेळोवेळी त्यांना केळी संगोपनाचे प्रशिक्षण देण्यात आले. शिंदे यांनी अपार कष्टाने हे पिक घेतले आणि जोपासले. त्यांनी गाळलेल्या घामाच्या प्रत्येक थेंबाचा आज मोती झाला असून त्याचा इतर शेतकऱ्यांनी आदर्श घ्यावा असे यश त्यांनी मिळवले आहे.

जलनायक मयंक गांधी यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून देशाला बदलायचे स्वप्न पाहिले. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली तरच देशाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो असे त्यांचे ठाम मत आहे. आजमित्तीस संस्थेसोबत ४० हजार पेक्षा जास्त सक्रिय शेतकरी जोडले गेले असून, फळबाग लागवडीच्या माध्यमातून त्यांचे उत्पन्न दहा पटींनी वाढल्याचे निष्कर्ष समोर आले आहेत. केज तालुक्यातील युसुफ वडगाव (सादोळा) येथे संस्थेच्या मार्फत अनेक शेतकऱ्यांनी केळीची लागवड केली असून, त्यांनी पिकवलेली उच्च दर्जाची केळी आता इराणला निर्यात होत आहे. केतन सतीश शिंदे हे त्यापैकीच एक शेतकरी आहेत. शिंदे यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये ५५ गुंठे जमिनीवर ६ ५ अंतरावर केळीची लागवड केली. लागवडीपासूनच निर्यात दर्जाचे उत्पन्न कसे घ्यावे? यासंदर्भात ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून मार्गदर्शन देण्यात आले. संस्थेच्या सिरसाळा येथील कृषीकुल या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रात त्यांना दोन दिवसीय केळी लागवड प्रशिक्षणही देण्यात आले. ५५ गुंठे क्षेत्रात प्रति झाड २५ किलो प्रमाणे त्यांना उतारा आला असून, आत्तापर्यंत १८ टन केळीचे निर्यात दर्जाचे उत्पन्न झाले असून, पुढील काही दिवसांत जवळपास २० टन केळीची काढणी करून निर्यात होईल अशी त्यांना दृढ अपेक्षा आहे. निर्यात झालेल्या केळीला प्रति किलो १८.५ एवढा दर मिळाला असल्याचेही शिंदे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले. ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आम्हाला आमच्या बांधावरच थेट अल्प दरात रोपे मिळाली. माझा मुलगा केतन च्या नावे असलेल्या ५५ गुंठे जमिनीवर आम्ही २००० रोपांची लागवड केली. सुरुवातीला कृषीकुल येथे दोन दिवसांचे मोफत मार्गदर्शन आम्हाला मिळाले. त्याचबरोबर संस्थेच्या तज्ञांनी आम्हाला बांधावर येऊन प्रत्यक्ष निर्यात दर्जाचे उत्पन्न कसे घ्यावे यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष मयंक गांधी सर आणि ग्लोबल विकास ट्रस्टने केलेल्या मदतीमुळे आमच्या उत्पन्नात कमालीची वाढ झाली. त्यांच्या सहकार्यामुळेच आमच्या गावातील अनेक शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती आली असल्याची प्रतिक्रिया शेतकरी केतन शिंदे यांचे वडील सतीश शिंदे यांनी व्यक्त केली.

# उन्हाळी तीळ लागवड तंत्रज्ञान

तीळ तेलात सिसामीन आणि सिसामोल हे दोन महत्वाचे घटक असलेने आयुर्वेदात तीळ पिकास अनन्यसाधारण महत्व आहे. तिळाच्या दर्जेदार आणि अधिक उत्पादनासाठी लागवड तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक आहे.

जमीन : जमीन खोल नांगरून तयार करावी. शेणखत : ५ टन/हेक्टरी जमिनीत टाकावे. जमीन भुसभुशीत करून फळी मारून सपाट करावी.

पेरणी : पेरणी बैल पाभरीने किंव्हा टोकन पद्धतीने करावी. बियाणे पेरणीची खोली : जमिनीत २.५ सेंटीमीटर खोली इतक्या खोलीवर बियाणे पेरावे.

जमिनीत २.५ सेंटीमीटर खोली पेक्षा जास्त खोलीवर टाकल्यास बियाणे उगवत नाही. म्हणून पेरणी करतांना योग्य ती काळजी घावी. ट्रॅक्टरने पेरणी करू नये. कारण ट्रॅक्टरला लावलेल्या पाभरीने बियाणे २.५ सेंटीमीटर खोलीवर न पडता त्याहून अधिक खोलीवर पडून पुढे उगवनक्षमता अतिशय कमी होते. म्हणून ट्रॅक्टरने पेरणी करणे टाळावे. वाळलेल्या शेणाच्या गोवऱ्या कुटून बारीक पावडर तयार करून चाळणीने गाळून घ्यावी. या पावडरमध्ये तीळ बियाणे एकत्रित करून पाभरीने पेरणी करावी. साधारणपणे १ किलो बियाणात ५ किलो गोवऱ्या कुटलेली पावडर एकत्रित करून पाभरीने पेरणी करावी. पेरणी अंतर : ४५ १० सेंटीमीटर अंतरावर करावी. बियाणे : २.५ किलो/हेक्टर तीळ बियाणे वापरावे. सुधारित जाती : फुले पूर्णा, टी एल टी - १०, एकेटी-१०१, एन टी ११. पेरणीची वेळ : १५ जानेवारी नंतर कमीत कमी तापमान २० डिग्री सेल्सिअस च्या वर गेल्यावर. कमी तापमानात उगवण क्षमतेवर परिणाम होतो. खत व्यस्थापन : ५० किलो नत्र/हेक्टरी विभागून द्यावा. पहिला नत्राचा हप्ता : २५ किलो नत्र/हेक्टरी पेरणीचे वेळी द्यावा. दुसरा नत्राचा हप्ता :२५ किलो नत्र/हेक्टरी पिक ३० दिवसाचे पिक झाल्यानंतर द्यावा. जमिनीत पुरेसा ओलावा असतांना पेरणी करावी. तीळ हे पिक जास्त पाण्याला अतिशय संवेदनशील असलेने दलदल असलेल्या भागात पेरणी करू नये. विरळणी : पीक उगवण झाल्यानंतर पहिली विरळणी १५ दिवसांनी करावी. दुसरी विरळणी ३० दिवसांनी करावी. पिक संरक्षण : तीळ पिकावर पाने कुरतडणारी अळीचा प्रादूर्भाव दिसून आल्यास क्विनोल्फोस १मिली.प्रती लिटर पाणी या प्रमाणे पिकावर फवारणी करावी. कोळपणी : पेरणीचे अंतर ४५ बाय १० सेंटीमीटर असलेने बैल कोळप्याने पहिली कोळपणी पिक ३० दिवसाचे असतांना करावी. प्रथम निंदनी : पिक ३० दिवसाचे असतांना करावी. दुसरी कोळपणी : ४५ दिवसांनी करावी.

दुसरी निंदनी : तण तीव्रता बघून पिक ६० दिवसाचे असतांना दुसरी निंदनी करावी पीक काढणी : साधारणपणे तिळाच्या बोन्ड्या पिवळसर झाल्याने कापणी करावी. कापणी केल्यावर पेंढ्या बांधून त्यांच्या खोपड्या करून वाळवाव्यात. साधारणपणे काढणीनंतर १० ते १५ दिवस पेंढ्या वाळवाव्यात. त्यानंतर जागेवरच तीळ बियाणे पेंढ्या उलट्या करून झटकून घ्यावे. उत्पन्न : ७ ते ८ क्विंटल/हेक्टरी.



# शेळ्यांमधील खुरसडा आजार; कारणे आणि उपाययोजना

शेळीपालन हा एक फायदेशीर व्यवसाय आहे. शेळी पालन व्यवसाय करण्यासाठी कमीत कमी जागा व खर्चही कमीत कमी लागतो. कमी खर्चात जास्त उत्पन्न मिळवून देणारा हा खात्रीशीर व्यवसाय आहे. शेळीला गरीबाची गाय म्हटले जाते.शेळीपालनामध्ये शेळ्यांना लागणारे खाद्य त्यांचा निवारा व प्रजननाची व्यवस्थापन या गोष्टी वरपुरेसे लक्ष दिले तर शेळीपालनामध्ये तोटा जास्त करून येत नाही. या शिवाय शेळ्यांमध्ये होणारे सर्व सामान्य आजार याबाबतही जागरूक राहणे फार गरजेचे आहे.पावसाळ्यामध्ये शेळ्यांना सहजासहजी खुरसडा आजार होतो.

आजार होण्याची कारणे : खुरसडा आजार हा जिवाणूमुळे होतो.यामध्ये शेळ्यांच्या पायातील दोन खूरांच्या मध्ये असलेल्या जागेवर जंतुसंसर्ग होतो. यामध्ये सुरुवातीला सूज येते व हळूहळू तो भाग सडायला सुरुवात होते व शेवटी पायाची खूर निकामी होते.

या आजाराचे लक्षणे : आजार झाल्यावर शेळ्या लंगडत चालतात आणि जाग्यावर उभे असतील तर ज्यापायाच्या खुराला सूज आहे तो पाय वर




उचलून धरतात. तसेच या आजारात शेळ्यांचे वजन झपाट्याने कमी व्हायला लागते.

खुरसड आजारावर करायचे उपाय : ज्या शेळ्या पावसाळ्यात चरायला जातात त्यांच्या साठी फुट वॉश चा वापर करावा.फुट वॉश साठी पोटॅशियम परमॅग्नेट वझिंक सल्फेट च्या द्रावणाचावापर करावा. तसेच शेडच्या प्रवेशद्वाराजवळ दोन टक्के फॉर्मलीन द्रावण वापरावे.शेळ्यांमध्ये या आजाराची लक्षणे असो किंवा नसो तरी वरील उपाय योजना करणे आवश्यक आहे. ज्या शेळ्यानंमध्ये या आजाराची लक्षणे दिसतात अशा शेळ्यांना बाहेर चरायला सोडू नये.अशा प्रादुर्भावीतशेळ्यांना पाणी आणि खाद्य जागेवर द्यावे.

कारण चरायला बाहेर गेल्यानंतर खुराला जखम होण्याची दाट शक्यता असते. आजार झाल्यास पशुवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करावेत असे बरे झालेल्या शेळ्यांना लगेच चरायला न सोडता तीन ते चार दिवस शेडमध्ये चारापाणी द्यावे. आजार झालेला असल्यास खुराकाचे प्रमाण जास्त वाढविल्यास शेळ्या लवकर बरे होतात.

या आजारावरील प्रतिबंधात्मक उपाय : १)शेळ्यांच्या खूर जास्तीचे वाढलेली असतील तर ते वेळोवेळी कापून काढावे. २)खुराच्या वरच्या बाजूचे केस जास्त वाढलेले असतील तर ते कापून काढावीत कारण यामध्ये घाणजमा होऊन नंतर खुरालासंसर्ग होतो. ३)खुराच्या मध्ये सूज आलेली आढळल्यास त्यावर माशा बसू नयेत किंवा आळ्या होऊ नयेत यासाठी स्प्रे मारावा. ४)उपचार करायच्या अगोदर पशुवैद्यकाचा सल्ला अवश्य घ्यावा.




## जागतिक दिवस
## जागतिक हिंदी दिवस

### महत्वाच्या घटना

१६६६ : सुरत लुटून शिवाजीमहाराज राजगडाकडे निघाले.
१७३० : पहिल्या बाजीरावाच्या कारकिर्दीत शनिवारवाड्याच्या बांधकामास सुरुवात झाली.
१८०६ : केपटाऊन येथे स्थायिक असलेले डच वसाहतवादी ब्रिटिशांना शरण गेले.
१८१० : नेपोलियन बोनापार्टने जोसेफाइन या आपल्या पहिल्या पत्नीला घटस्फोट दिला.
१८३९ : पहिल्यांदा भारताचा चहा इंग्लंड ला पोहचला.
१८६३ : चार्ल्स पिअर्सन याच्या आराखड्यानुसार रचना केलेल्या ७ किमी लांबीच्या व सात स्थानके असलेल्या भुयारी रेल्वेची लंडनमध्ये सुरूवात झाली.
१८७० : जॉन डी. रॉकफेलर याने 'स्टँडर्ड ऑईल' कंपनीची स्थापना केली.
१८७० : बॉम्बे, बडोदा अँड सेंट्रल इंडिया रेल्वे या ब्रिटिशकालीन रेल्वे कंपनीच्या इतिहासाचे साक्षीदार असलेले चर्चगेट रेल्वे स्थानक सुरू झाले. या स्थानकावर फक्त एक फलाट होता.
१८८४ : ब्रिटन च्या रसायन शास्त्रज्ञ जोज़फ एस्पीडियन यांनी पहिल्यांदा सिमेंट बनविले.
१९२० : पहिले महायुद्ध व्हर्सायचा तह अस्तित्त्वात आल्याने पहिले महायुद्ध संपले.
१९२६ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी हुतात्मा स्वामी श्रद्धानंदांच्या स्मरणार्थ 'श्रद्धानंद' साप्ताहिक मुंबईत सुरू केले.
१९२९ : जगात अमाप लोकप्रियता मिळालेले 'द अ‍ॅडव्हेंचर्स ऑफ टिनटिन' हे कॉमिक प्रथमच प्रसिद्ध झाले.
१९६६ : भारत व पाकिस्तान यांच्यात ताश्कंद करार झाला.
१९७२ : पाकिस्तानमधील तुरुंगात ९ महिने काढल्यानंतर शेख मुजीबूर रहमान हे राष्ट्राध्यक्ष म्हणून नुकतेच स्वातंत्र्य मिळालेल्या बांगला देश मधे परतले.
२००६ : माजी प्रधान मंत्री मनमोहन सिंग यांनी १० जानेवारी ला जागतिक हिंदी दिवस म्हणनू साजरे करण्याची घोषणा केली.
२००८ : टाटा कंपनी ने जगातील सर्वात स्वस्त कार नॅनो कार ला बाजारात आणण्यासाठी सुरुवात केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७५ : बाजीराव पेशवे (दुसरे) (मृत्यू: २८ जानेवारी १८५१ ब्रम्हावर्त)
१८९६ : नरहर विष्णू तथा 'काकासाहेब' गाडगीळ स्वातंत्र्यसैनिक, लेखक, वक्ते, राजकीय नेते, केंद्रीय मंत्री आणि पंजाबचे राज्यपाल (मृत्यू: १२ जानेवारी १९६६)
१९०० : मारोतराव सांबशिव कन्नमवार महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री (२० नोव्हेंबर १९६२ ते २४ नोव्हेंबर १९६३) (मृत्यू: २४ नोव्हेंबर १९६३)
१९०१ : इतिहास संशोधक डॉ. गणेश हरी खरे यांचा पनवेल येथे जन्म
१९१९ : संस्कुत अभ्यासक आणि रामायणातील शाप आणि वर, महाभारतातील कुमारसंभव या ग्रंथांचे लेखक श्री. र. भिडे यांचा जन्म.
१९२७ : तमिळ अभिनेते शिवाजी गणेशन यांचा जन्म.
१९३७ : भातीय राजनीती तज्ञ मुरली देवड़ा यांचा जन्म.
१९४० : के. जे. येसूदास पार्श्वगायक व संगीतकार
१९४९ : प्रसिद्ध दक्षिणात्य चित्रपट निर्माते अल्लू अरविंद यांचा जन्म.
१९५० : आदिवासींसाठी आयुष्य वेचणारया नाजुबाई गावित यांचा जन्म.
१९७१ : प्रसिद्ध बासरी वादक राकेश चौरसिया यांचा जन्म.
१९७४ : हृतिक रोशन सिनेकलाकार
१९८४ : भारतीय अभिनेत्री कल्कि कोचेलिन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६९३ : कोलकत्याचे निर्माते म्हणून ओळखले जाणारे जाब चारनाक यांचे निधन.
१७६० : दत्ताजी शिंदे पानिपतच्या पहिल्या संग्रामातील रणवीर (जन्म: १७२३)
१७७८ : कार्ल लिनिअस स्वीडीश वनस्पतीतज्ञ, वनस्पतींच्या दुहेरी नामकरणाची आंतरराष्ट्रीय पद्धत त्याने विकसित केली. ही पद्धत त्याला इतकी आवडली की त्याने स्वत:चेही नाव बदलून कॅरोलस लिनिअस असे केले. (जन्म: २३ मे १७०७)
१९६९ : उत्तर प्रदेश चे माजी मुख्यमंत्री संपूर्णानंद यांचे निधन.
१९९४ : ला प्रसिद्ध लेखक गिरिजाकुमार माथुर यांचे निधन.
१९९९ : आचार्य श्रीपाद कृष्ण केळकर स्वातंत्र्य सैनिक व समाजवादी विचारवंत
२००२ : पं. चिंतामणी रघुनाथ तथा सी. आर. व्यास ख्यालगायक, गुरु व बंदिशकार (जन्म: ९ नोव्हेंबर १९२४)

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# जायकवाडी प्रकल्पग्रस्त पुनर्वसित गावांसाठी सुमारे ५ कोटींचा निधी मंजूर

## आमदार मोनिकाताई राजळे यांच्या पाठपुराव्याला यश

अहिल्यानगर । प्रतिनिधी

जायकवाडी प्रकल्पामुळे (नाथसागर जलाशय) १९७० च्या दशकात शेवगाव तालुक्यातील अनेक गावे पूर्णतः किंवा अंशतः बाधित झाली होती. या प्रकल्पग्रस्त पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी महसूल व वन विभागाच्या दिनांक ६ जानेवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार सुमारे ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आमदार मोनिकाताई राजळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निधी उपलब्ध झाला असून, या माध्यमातून रस्ते व अंतर्गत विकासकामांना मोठी चालना मिळणार आहे.

आमदार मोनिकाताई राजळे यांच्या मागणीनुसार पुनर्वसित मौजे सोनविहीर येथे सोनुबाई मंदिर ते पहिलवानबाबा मंदिर रस्ता (सा.क्र. ०/०० ते २/६२५ किमी) मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी २ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. तसेच मौजे कऱ्हेटाकळी अंतर्गत कऱ्हेटाकळी ते खानापूर लिफ्ट रस्ता (सा.क्र. ०/०० ते १/९४० किमी) मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी १ कोटी ४५ लाख रुपये, मौजे लाखेफळ अंतर्गत लाखेफळ ते जुने दहिफळ रस्ता (सा.क्र. १/०५० ते २/६०० किमी) मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी १ कोटी



२१ लाख रुपये, तर मौजे खानापूर येथे गावाअंतर्गत रस्त्यांच्या काँक्रीटीकरणासाठी २९ लाख ८८ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. एकूण मिळून ४ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी या कामांसाठी प्राप्त झाला आहे. आमदार मोनिकाताई राजळे यांच्या दिनांक ०८ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या पत्रान्वये या सर्व कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामांसाठी तातडीने निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यारंभ आदेश देण्याच्या सूचना आमदार राजळे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.या निधीमुळे प्रकल्पग्रस्त व पुनर्वसित गावांमधील दळणवळण, सुरक्षितता आणि नागरिकांच्या दैनंदिन सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी आमदार मोनिकाताई राजळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.



# मराठवाड्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात!

## सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने – डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यात २०२५ या वर्षात एकूण ११२९ शेतकरी आत्महत्या झाल्या असून, त्यामध्ये बीड जिल्ह्यातील २५६ शेतकऱ्यांनी आत्महत्या करत मरणाला कवटाळले आहे. मागील दोन वर्षांपासून बीड जिल्हा मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांमध्ये आघाडीवर असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. शासन व प्रशासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढले असून, सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण या घोषणेच्या निषेधार्थ शुक्रवार दि. ०९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण या घोषणाबाजी करत जोरदार निदर्शने करण्यात आली.

ही निदर्शने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यावेळी आंदोलकांनी सरकार व प्रशासनाने केवळ फोटोसेशनपुरते मर्यादित न राहता शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी ठोस व परिणामकारक पावले उचलावीत अशी ठाम मागणी केली. यासंदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले. यावेळी आंदोलनात माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष,आम आदमी पार्टी, रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक), कुलदीप करपे (जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना) शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, सुहास जायभाये, माहिती आधिकार कार्यकर्ते शेख मुबीन, पांडुरंग हराळे, गणेश नाईकवाडे (जिल्हाध्यक्ष मराठा महासंघ), प्रा.डी.जी.तांदळे(अध्यक्ष म. रा. किसानसभा जि.बीड, प्रा.राजकुमार यादव, डॉ.संजय तांदळे आदी सहभागी होते.

# जागतिक धम्म दिनानिमित्त धम्म ध्वजारोहण

अंबड । प्रतिनिधी

पंचशील धम्म ध्वज प्रेम ,दया ,शांती, मध्यम मार्ग ,ज्ञान, सदाचार, धम्माची शुद्धता दर्शविते भदंत राजरत्न ८ जानेवारी रोजी अंबड येथील महात्मा फुले नगर ज्ञानभूमी येथे जागतिक धम्म ध्वज दिनानिमित्ताने भारतीय बौद्ध महासभा जिल्हा जालना संघटक आयुष्यमान चंद्रकांत दिल पाक यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले .याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हाध्यक्ष आयु. ज्योतीताई खरात होत्या.हा कार्यक्रम भारतीय बौद्ध महासभा अंबड तालुका अध्यक्ष आयुष्यमान उत्तमराव येडे यांच्या नियोज ना नुसार संपन्न झाला.



या कार्यक्रमास भदंत राजरत्न यांनी प्रसंगीक धम्मदेशना दिली .प्रेम ,दया ,शांती ,मध्यम मार्ग ,ज्ञान ,सदाचार ,आणि धम्माची शुद्धता ,धम्म ध्वज दर्शवितो.हे सांगितले. कार्यक्रमास अंबड शहरातील आयु.लता रुपवते, सविता वाघमारे ,भावनाताई दिल पाक, चंद्रकलाताई खंडागळे, रेश्मा ओव्हाळ ,कुमारी सुहासिनी ओव्हाळ, सयाबाई पटेकर ,आयुष्यमान प्रकाशजी घायतडक सर, आयुष्यमान अच्युतराव उघडे सर, आयुष्यमान काशिनाथराव पटेकर ,इत्यादी सह बाल बालिका कार्यक्रमास उपस्थित होते. सरनातय गाथेने फलहार घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# डिजीटल जनगणनेतील अद्यावत तंत्रज्ञानामुळे माहिती विश्वसनीय ठरेल

जालना । प्रतिनिधी

भारताची जनगणना ही एकाच टप्प्यात पार पडणार आहे. कोणतेही घर अथवा कुटुंब या जनगणनेतून सुटता कामा नये, या जनगणनेचा मुख्य उद्देश फक्त आकडे गोळा करणे नसून कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची इत्यंभूत माहिती गोळा केली जाणार आहे. आपणास संपुर्ण घर यादी व गटाची संरचना समजावून सांगण्यात येत आहे. तरी डिजीटल जनगणनेतील वापरात येणाऱ्या अद्यावत तंत्रज्ञानामुळे अधिक अचूकता आणि पारदर्शकतेसह जनगणनेला गती मिळुन माहिती अधिक विश्वसनीय ठरेल.

महाराष्ट्र जनगणना संचालनालय व केंद्रीय गृह मंत्रालय यांच्या वतीने आज दि.८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते २.३० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पहिले प्रशिक्षण पार पडले. जनगणना संचालनालयाचे अधिकारी प्रविण भगत व अरुण साळेगावकर यांनी संगणकीय सादरीकरण व प्रश्नोत्तराच्या माध्यमातून सुलभ पध्दतीने प्रशिक्षण दिले. यावेळी घनसावंगीचे तहसीलदार रमेश पागोटे यांच्यासह महानगरपालिका अधिकारी, सर्व तहसीलदार, नगर परिषद मुख्याधिकारी, नायब तहसिलदार, सहाय्यक महसुल अधिकारी, मंडळ अधिकारी, नगर रचनाकार व जनगणना लिपिक आदि अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

जनगणना प्रक्रियेच्या पहिल्या टप्यामध्ये घर यादी व घरगणना ही मे ते जून २०२६ मध्ये सुरु होणार असुन त्याबाबत अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचाही आज प्रारंभ झाला आहे. राष्ट्रीय जनगणनेचा दुसरा टप्पा फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणार आहे. जनगणनेचे काम अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे जनगणना कामाशी संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी प्रशिक्षण, आढावा बैठकीस हजर राहणे व प्रत्यक्ष सोपविण्यात आलेली जबाबदारी अचूकपणे पार पाडणे व प्रशिक्षण दिलेल्या सूचनाचे काटेकोर पालन करून कामकाज पार पाडावेत. तरी जनगणना २०२७ जनगणना कामासाठी नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अचूक माहिती संकलनासाठी सुयोग्य नियोजन करावे, असे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी यावेळी सुचित केले. जालना जिल्ह्यात अद्यावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाची माहिती संकलीत केली जाणार आहे. अचूक विश्वासार्ह लोकसंख्येची आकडेवारी मिळविण्यासाठी यावेळी मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करण्यात येणार आहे.

संपूर्ण प्रक्रियेच्या देखरेखीसाठी केंद्रीय पोर्टल कार्यान्वित राहणार आहे. त्यामुळे जनगणना संबंधीत सर्व चार्ज अधिकारी कर्मचारी यांनी गट नियोजन, पर्यवेक्षक, प्रगणक यांच्या नियुक्तीबाबत आवश्यक नियोजन तसेच जनगणना प्रक्रियेतील प्रत्येक तरतूद काळजीपूर्वक समजून घेऊन अमंलबजावणी करण्याचे निर्देशही प्रशिक्षणात अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

# मृद व जलसंधारण योजनांची सर्व कामे वेळेत पूर्ण करा–जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

शासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण या दोन्ही योजना कायमस्वरुपी राबविण्याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या या दोन्ही योजना ग्रामीण भागातील जलसंधारणासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या योजनांचे मुख्य उद्दिष्ट भूजल पातळी वाढवणे आणि शेतीसाठी पाण्याचा शाश्वत स्त्रोत निर्माण करणे हे आहे. तरी मृद व जलसंधारण योजनांची सर्व कामे विहीत वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात शुक्रवार दि.९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी गहिनीनाथ कापसे, जिल्हा जलसंधारण अधिकारी एस.एस.वाघमारे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी व्ही.ढोबळे यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जिल्ह्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, सामुहिक शेततळे, बांधबंदिस्ती, फळबाग लागवड योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. तसेच गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आणि नाला खोलीकरण व रुंदीकरणाची कामे, प्रलंबित कामे तत्परतेने पुर्ण करावी. खोलीकरणामुळे पाणी जमिनीत जिरण्याचे प्रमाण वाढेल, ज्याचा फायदा परिसरातील विहिरींना होईल. जिल्ह्यातील टँकरमुक्त गावे करण्यासाठी पाण्याचा साठा अत्यंत महत्वाचा आहे. ग्रामस्तरीय ग्रामरोजगार सेवकांना योग्य प्रशिक्षण देवून प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले. गाळ काढण्यासाठी व नाला खोलीकरण व रुंदीकरण करण्यासाठी यंत्रसामुग्री व इंधन खर्च यासाठी ३१ रुपये प्रती घ.मी. दर अदा करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना गाळ वाहुन नेण्यासाठी अनुदान ३५.७५ रुपये प्रती घ.मी. हे फक्त गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेसाठी लागू राहील. जिल्हास्तरीय समितीकडून कार्यपध्दतीप्रमाणे काम करणे व अवनी ग्रामीण ॲपनूसार वेळोवेळी आढावा घेण्यात येत असतो. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ४० कामे पुर्ण झाली असून ४००९३६ घ.मी. गाळ काढण्यात आलेला आहे. सन २०२५-२६ अंतर्गत पुर्ण झालेल्या ४० कामांची २७२.५३ लक्ष रुपये इतकी निधी मागणी व सन २०२४-२५ अंतर्गत ९ कामांची ४७.५२ लक्ष रुपये असे एकुण ४९ कामांची ३२०.०५ लक्ष इतकी निधी मागणी शासनास सादर करण्यात आली आहेत. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा आराखडा सादर करण्यात आलेला आहे. यामध्ये चालू व मागील वर्षातील जलाशयातील कामे कामांची संख्या ८०, गाळ परिमाण ८६३.९७ स.घ.मी. तर रक्कम ६०९.९४ लक्ष रुपये एवढी आहे. आगामी वर्षातील गाळमुक्त धरणाची जलाशयातील कामे कामांची संख्या ७२४, गाळ परिमाण ८३५८ स.घ.मी. तर रक्कम ६१३१.९६ लक्ष रुपये एवढी आहे.


### जाहीर प्रगटन

**मा.श्री. व्ही.सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५५/२०२६,**
**ॲड. एम.आर. गर्जे यांच्यामार्फत**
**शंकुतला भ्र. भास्कर भांगे वि. निरंक**

ज्यापेक्षा भास्कर पि. पांडुरंग भांगे हे दिनांक ०७-०२-२०२५ रोजी रुबी हॉल क्लिनिक, पुणे, ता.जि.पुणे येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार १. शंकुतला भ्र. भास्कर भागे, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. मंत्रा मोमेंट सोसायटी, देहु आळंदी रोड, बोराडेवाडी, मोशी, पुणे. २. प्रशांत पि. भास्कर भांगे, वय ३५ वर्षे, धंदा वैद्यकिय व्यवसाय, रा. सदर. ३. प्रियंका भ्र. दत्तात्रय जवरे, वय ३७ वर्षे, धंदा वैद्यकिय व्यवसाय, रा. बीड रोड, शिरुर कासार, ता. शिरुर कासार, जि. बीड ४. इंद्राबाई पि. पांडुरंग भांगे, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. अवलपुर, ता.जि. बीड अर्जदार क्रं. १ ही मयत नामे भास्कर पि. पांडुरंग भांगे यांची पत्नी आहे. अर्जदार क्रं. २ हा मयताचा मुलगा आहे, अर्जदार क्रं. ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे तर अर्जदार क्रं. ४ ही मयताची आई आहे. मयताचे वडील यापूर्वी मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत भास्कर पि. पांडुरंग भांगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २३/०२/२०२६ आहे.

आज दिनांक ०८ जानेवारी २०२६ रोजी माझया, सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित
क. लिपीक

आदेशाव आदेशावरुन
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.



### जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९९३/२०२५**
**ॲड. बी.एन. तावरे यांचे मार्फत**
**प्रशांत कुलकर्णी वि. निरंक**

ज्यापेक्षा प्रतिभा उर्फ लता भ्र. प्रभाकर कुलकर्णी, हे दिनांक २१/०२/२०२५ रोजी स्वराज्य नगर, बीड ता.जि. बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार

१. प्रशांत पि. प्रभाकर कुलकर्णी, वय. ५३ वर्षे, धंदा. शेती व व्यापार, रा. स्वराज्य नगर, बीड, ता.जि.बीड २. प्रमोद पि. प्रभाकर कुलकर्णी, वय. ४८ वर्षे, धंदा. नौकरी, रा.वरीलप्रमाणे ३. प्रज्ञा पि. प्रभाकर कुलकर्णी, वय. ५० वर्षे, धंदा. नौकरी रा. तिरुपती कॉलनी, बीड, ता.जि.बीड

अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले आहेत, अर्जदार क्र. ३ ही मयताची मुलगी आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे प्रतिभा उर्फ लता भ्र. प्रभाकर कुलकर्णी, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख १२/०१/२०२६, ही आहे.

आज दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित
कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

आदेशाव आदेशावरुन
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.



Daily Rajya Loktantra Date 10/01/2026

### PUBLIC NOTICE

CHANGE IN NAME
I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OLD NAME:- VIKAS LIMBAJI PAWAR CHANGE IN TO MY NEW NAME :- VIKAS LIMBAJIRAO PAWAR PRESENT ADD:- PACHOD ROAD AMBAD, AT. SAMBHAJINAGAR AMBAD, AMBAD, JALNA, MAHARASHTRA-431204
mo. 8329059134



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/७३८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ३०/१२/२०२५

नाव बदलण्याचा

### जाहिरनामा

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) कविता किशोर शिंदे सर्व्हे नं.-७९ सहन प्लॉट नं. २२ नं.प.मि.नं.१८-१६०-२२ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१६०-२२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नं. २३
पश्चिम : सर्व्हे नं. ७९ मधील जमीन
दक्षिण- प्लॉट नं. ३२
उत्तरः १२ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

स्वाक्षरित
मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड


# राष्ट्रवादीची भररस्त्यावर सभा; वाहतूक अडथळामुळे नागरिकांचे हाल

## भोंग्याच्या दोन तास आवाजामुळे जिल्हा स्त्री बालरुग्णालत गोंधळ

जालना । प्रतिनिधी

महानगरपालिका निवडणूक प्रचाराच्या सभा रस्त्यावर घेऊ नका, अशी मागणी व्यापारी महासंघाकडून करण्यात आली होती. मात्र, तरीदेखील प्रशासनाकडून रस्त्यांवर प्रचारसभांना मान्यता दिली जात आहे. गुरुवारी रोजी झालेल्या अजित पवार गट राष्ट्रवादीच्या सभेदरम्यान गांधी चमन चौकात वाहतूक कोंडी झाली होती. शिवाय जिल्हा स्त्री व बालरुग्णालयासमोरच दोन तास भोंग्यांचा कर्कश आवाज सुरू होता.

यामुळे जिल्हा रुग्णालयामध्ये प्रचंड गोंधळ निर्माण झाला होता. या आवाजामुळे कोणाच्या कोणाला ताळमेळ लागत नव्हता. तसेच दवाखान्यातील लहान मुलं भोंग्याच्या आवाजामुळे रडत होती असे बोलल्या जात आहे. त्यामुळे नेत्यांचा प्रचार आणि सामान्यांना त्रास अशी अवस्था पाहायला मिळाली.

शहरातील गांधी चमन येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची गुरुवारी जाहीर सभा झाली. ही सभा भरदुपारी असल्याने सकाळपासूनच या ठिकाणी व्यासपीठ उभारण्याचे काम सुरू झाले होते. दुपारी दोनपासून गांधी चमन चौकामध्ये भररस्त्यावर खुर्च्या टाकण्यात आल्या होत्या त्यामुळे या मार्गावर रहदारीला अडथळा निर्माण झाला. साडेपाचपर्यंत हा मार्ग वाहतुकीसाठी एक प्रकारे बंदच केला गेला. त्यामुळे वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागला. दरम्यान, शहरातील रस्त्यांसह चौकांमध्ये राजकीय सभांना परवानगी देऊ नये, अशी मागणी व्यापारी महासंघाने यापूर्वीच केली होती. मात्र, तरीदेखील प्रशासनाने शहरात मैदाने असतानादेखील रस्त्यावरच परवानगी देणे हे चुकीचे आहे. शहरात अनेक मैदाने आहेत. आझाद मैदान, फ्रेझर बॉइज मैदान, स्व. कल्याणराव घोगरे क्रीडा संकुल, पोलिस मैदान यांसह क्रीडा संकुल देखील आहे. परंतु, सभा घेताना राजकीय नेत्यांचा अट्टहास हा शहरातील मामा चौक, गांधी चमन, नूतन वसाहत याच भागांकडे अधिक असतो. विशेष म्हणजे मैदान सोडून प्रशासनही शहरातील रहदारी भागातच सभा घेण्यास परवानगी देणे चुकीचे आहे.

सव्वादोन तास भोंग्यांच्या कर्कश आवाजामुळे गांधी चमन परिसरामध्ये जिल्हा स्त्री व बालरुग्णालय आहे. येथे जिल्हा-भरातून प्रसूतीसाठी रुग्ण दाखल होतात. जाहीर सभेमध्ये दुपारी तीनपासून ते सव्वापाचपर्यंत भोंग्यांचा कर्कश आवाज सुरू होता. रुग्णालयात नवजात बालके असतात. प्रशासनाने या भागात सभेला परवानगी देताना या नवजात बालकांसह रुग्णांचाही विचार करणे गरजेचे होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
शनिवार दि.१० जानेवारी २०२६ | ६

# जन्म-मृत्यू प्रमाणपत्र रद्द करणे प्रकरणी प्रशासनाला शपथपत्र दाखल करण्याचे आदेश

## हजारोंचे जन्म प्रमाणपत्र रद्द; सय्यद एजाज यांच्या नेतृत्वाखाली उच्च न्यायालयात लढा

गेवराई प्रतिनिधी :

गेवराई तालुक्यात दि. ११ ऑगस्ट २०२३ नंतर निर्गमित झालेली हजारो जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे कोणतीही पूर्वसूचना वा सुनावणी न देता रद्द करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड मानसिक व प्रशासकीय त्रास सहन करावा लागला. या मनमानी कारभाराविरोधात माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी पुढाकार घेत पीडित नागरिकांना एकत्र केले आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल करून प्रशासनाला थेट न्यायालयाच्या कक्षेत उभे केले.



तहसीलदार गेवराई यांच्या आदेशाने कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेली प्रमाणपत्रे सरसकट रद्द करण्यात आली. हा निर्णय जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम तसेच संविधानातील अनुच्छेद १४, १९ व २१ चे उल्लंघन करणारा असल्याचा ठपका ठेवत न्यायालयात आव्हान देण्यात आले.

तहसिलदार गेवराई यांनी दि.१९ मार्च २०२५ रोजी आदेश पारीत करुन दि.०२/०२/२०२४ ते २१/०१/२०२५ या कालावधीतील तहसील कार्यालयातून नायब तहसिलदार यांच्या आदेशानुसार निर्गमित झालेले संपूर्ण जन्म मृत्यु चे आदेश रद्द करण्याचा आदेश पारीत केला होता. तसेच तो आदेश महाराष्ट्र शासनाने दि.१६ सप्टेंबर २०२५ रोजी शासन निर्णय पारीत करून नव्याने जन्म मुत्यु प्रमाणपत्र काढण्यास जाचक अटी लावण्यात आले होते ते दोन्ही आदेश असंविधानिक असल्याचे घोषित करुन तो रद्द करून बातल व्हावे अशि देखील मागणी याचिक मध्ये करण्यात आली होती. तर माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी गरीब, वंचित, मजूर, विद्यार्थी यांची आयुष्यभराची कागदपत्रे एका झटक्यात अमान्य करणे हे अन्यायकारक आहे, अशी ठाम भूमिका घेतली. दि. ०५ जानेवारी २०२६ रोजी सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने राज्याचे मुख्य सचिव, विभागीय आयुक्त (छ. संभाजीनगर), जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार व नायब तहसीलदार गेवराई यांना २३ जानेवारीपर्यंत शपथपत्र दाखल करण्याचे आदेश दिले.

# माजलगावचे तीन गुंड तीन जिल्ह्यातून हद्दपार

**बीड । प्रतिनिधी**

**माजलगाव शहरातील गावात दहशत पसरणारे, चोऱ्या करणारे तीन गुंड अशोक मंदे,कृष्णा नीरडे, अभिषेक शिंदे यांना बीड, परभणी व जालना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आल्याचे आदेश पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी ९ जानेवारी रोजी पारित केले. त्यांना पोलिसांनी या तीन जिल्ह्यांमध्ये प्रवेश बंदी केली आहे.**

**पोलीस अधीक्षकांची कारवाई**

माजलगाव येथील अशोक वसंत मंदे, कृष्णा तुकाराम निरडे, अभिषेक अशोक शिंदे या तिघांना चोऱ्या,घरफोड्या, खून, खुनाचा प्रयत्न, दंगा ,जबरी चोऱ्या, दरोडे टाकणे, लोकांना मारहाण करून गंभीर जखमी करणे, जनतेत दहशत निर्माण करणे या कलमाखाली तीन जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. त्यांच्यावर अनेक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याने त्यांच्याविरुद्ध पोलीस अधीक्षकांकडे हद्दपारीचा प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. याची उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी चौकशी केल्यानंतर आणि त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर त्यांच्याविरुद्ध बीड, परभणी व जालना जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश पारित केले. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी केली.

# फडात उभ्या ट्रकला आग; चार एकर ऊस जळून खाक, सात लाखांचे नुकसान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव शिवारात शुक्रवारी दुपारी ऊस तोडणी सुरू असताना एका दहा टायर ट्रकच्या बॅटरीमध्ये झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग लागली. या आगीत शेतकरी पार्थ उत्तम सोळंके यांचा काढणीला आलेला चार एकर ऊस आणि संबंधित ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला असून, यामुळे शेतकऱ्याचे सुमारे सात लाख रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जवळगाव येथील



सोळंके यांच्या शेतात उसाची तोडणी सुरू होती. तोडलेला ऊस वाहून नेण्यासाठी आलेल्या ट्रकच्या ◀◀ पान ३ वर

# धनंजय मुंडे आज गहिनीनाथगडावर

**पाटोदा । प्रतिनिधी**

वैराग्यमूर्ती संत वामनभाऊ यांचा सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळा पाटोदा तालुक्यातील श्री क्षेत्र गहिनीनाथगड येथे उद्या संपन्न होत असून, प्रति वर्षीच्या परंपरेनुसार याही वर्षी पुण्यतिथी सोहळ्याच्या प्रमुख महापुजेचा मान माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांना आहे. यानिमित्त धनंजय मुंडे हे श्री क्षेत्र गहिनीनाथगड येथे उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते संत वामनभाऊ यांच्या समाधीची महापूजा सकाळी संपन्न होणार आहे.



संत वामनभाऊ यांच्या पुण्यतिथीचा सुवर्णमहोत्सव साजरा होत असताना धनंजय मुंडे यांच्या हस्ते महापूजा करण्याच्या परंपरेला देखील या वर्षी २५ वर्षे पूर्ण होत आहेत, हा योगायोग जुळून आला आहे. दरम्यान मागील २५ वर्षांत धनंजय मुंडे यांनी त्यांचा अपघात झाला तेव्हाचे एक वर्ष वगळता कधीही या महापूजेला खंड पडू दिलेला नाही. पारंपरिक पद्धतीने ही महापूजा संपन्न होणार आहे.

# राजमाता जिजाऊ यांच्या पुतळा परिसराची डॉ.सारिकाताई क्षीरसागरांनी केली पाहणी

बीड (प्रतिनिधी)

दि.९ : राजमाता जिजाऊ यांची जयंती येत्या १२ तारखेला उत्साहात साजरी होणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील राजमाता जिजाऊ यांच्या पुतळा परिसराची भाजपच्या गटनेत्या तथा नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी गुरुवारी (दि.८) पाहणी करून पूर्वतयारीचा आढावा घेतला.

यावेळी त्यांनी पुतळा परिसरातील रंगरंगोटी, स्वच्छता, उद्यानातील विविध कामांची पाहणी केली. संबंधित



अधिकाऱ्यांना कामे तत्काळ पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, परिसरात महिलांसाठी उभारण्यात आलेल्या ओपन जिमची तत्काळ दुरुस्ती करून ती सुरू करण्याच्या सूचना ◀◀ पान ३ वर

# स्व.गणेश डोंगरे कुटुंबाच्या दु:खात ना.पंकजाताई मुंडेचा खंबीर आधार

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी येथील ऊसतोड कामगार गणेश डोंगरे यांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर कुटुंबावर कोसळलेल्या संकटात पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी डोंगरे कुटुंबीयांना दिलासा दिला आहे. मी कायम डोंगरे कुटुंबासोबत आहे असे ठाम आश्वासन देत त्यांनी तातडीने मदत मिळवून देण्याची ग्वाही दिली आहे.

पंकजाताई मुंडे यांनी दूरध्वनीवरून डोंगरे कुटुंबीयांशी संवाद साधत या दुर्दैवी घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. त्यांच्या



सूचनेनुसार माजी आमदार केशवराव आंधळे, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार संघटनेचे नेते कृष्णा तिडके यांच्या हस्ते डोंगरे कुटुंबीयांना तातडीची मदत पोहोचविण्यात आली. यावेळी ना. पंकजाताई मुंडे यांनी डोंगरे कुटुंबीयांशी दुरध्वनीवरून संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, खरंच खूप बाईट झालं, मुलींची काळजी घ्या. ही हृदय पिळवटून टाकणारी घटना आहे. काहीही लागल्यास नक्की सांगा. मी लवकरच प्रत्यक्ष भेट घेईन आणि तुमच्या पाठीशी

खंबीरपणे उभी आहे, असे भावनिक शब्द त्यांनी कुटुंबीयांना सांगितले. डोंगरे कुटुंबीयांना शासकीय मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करणार असल्याचेही ना. पंकजाताई मुंडे यांनी स्पष्ट केले. त्यांच्या सूचनेनुसार माजी आमदार केशवराव आंधळे, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार संघटनेचे नेते कृष्णा तिडके यांच्या हस्ते डोंगरे कुटुंबीयांना तातडीची मदत ◀◀ पान ३ वर

# दहशतवाद विरोधी पथकाची पात्रुड येथे मोठी कारवाई

## माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात चौघांवर गुन्हा दाखल,दोघेजण ताब्यात

माजलगाव । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगरच्या दहशतवादी विरोधी पथकाने बीडच्या माजलगावमधील पात्रुड गावात कारवाई केली आहे. अहिल्यानगरच्या फैजान ए-कन्झूल इमान या ट्रस्टचा नोंदणी क्रमांक वापरून गुलजार ए-रझा ट्रस्टच्या नावाने लातूरमध्ये पाच वेगवेगळी खाते उघडून धार्मिक कामाच्या नावाखाली ४ कोटी ७३ लाख ६७ हजार ५०३ रुपयांचा निधी जमा करण्यात आला. संबंधित रक्कम स्वत:च्या फायद्यासाठी वापरण्यात आल्याप्रकरणी छत्रपती संभाजीनगरच्या एटीएस ने छापा मारत दोघांना ताब्यात घेतले.




यामध्ये चार जणांविरुद्ध माजलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. इमरान कलीम शेख (सदर बाजार, अंबाजोगाई), मुज्जम्मिल नूर सय्यद (सत्तार गल्ली पात्रुड), अहमदुद्दीन कैसर काझी (रोजा मोहल्ला, केज) व तौफीक जावेद काझी या चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील मुज्जम्मिल नूर व अहमदुद्दीन काझी या दोघांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे.पात्रुडमध्ये गुलजार ए रझा या नावाच्या ट्रस्टची चुकीच्या पद्धतीने नोंदणी केल्याचे कागदपत्रांच्या आधारे आढळून आले. या ट्रस्टच्या नावाने लातूरमधील क्सिस बँकेमध्ये पाच बोगस खाते तयार करण्यात आले होते.या खात्यात चार कोटी रुपुये जमा करण्यात आले होते.सदर निधी धार्मिक कामाच्या संदर्भाने जमा करण्यात येत असल्याची प्राथमिक माहिती आहे. गुलजार ए रझाची बीड जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमधील दुय्यम निबंधक कार्यालयांकडून माहिती घेतली असता याची तेथेही त्यांची नोंदणी आढळून आली नाही. ट्रस्ट किंवा संस्थेने त्यांची ◀◀ पान ३ वर

# आष्टी बस स्थानकात धूळ व घाणीचे साम्राज्य;प्रवाशांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील बस स्थानक परिसरात सध्या प्रचंड प्रमाणात धूळ उडत असून त्याचबरोबर घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र दिसून येत आहे. स्वच्छता, पाणी फवारणी तसेच कचरा व्यवस्थापनाकडे संबंधित ठेकेदाराकडून पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याने प्रवासी व नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे.

बस स्थानकाच्या आवारात साचलेली घाण, उघड्यावर पडलेला कचरा, धुळीचे लोट यामुळे दुर्गंधी पसरली असून प्रवाशांना श्वास घेण्यास त्रास होत आहे. याचा



सर्वाधिक फटका लहान मुले, वृद्ध, महिला तसेच आजारी प्रवाशांना बसत आहे. सातत्याने अशा वातावरणात वावर केल्यास दमा, खोकला, सर्दी, ॲलर्जी व इतर श्वसनविकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दररोज शेकडो प्रवासी ये-जा करत असलेल्या आष्टी बस स्थानकात मूलभूत स्वच्छतेच्या सुविधा न मिळाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही संबंधित ठेकेदार व प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप प्रवाशांकडून ◀◀ पान ३ वर



# नागरिकांची तत्परता व डॉक्टरांच्या सेवाभावामुळे मुक्या गाईचा प्राण वाचला

आष्टी । प्रतिनिधी

शुक्रवारी सकाळी ठीक ८ वाजून २५ मिनिटांनी ग्रामीण रुग्णालयाच्या समोर एक मोक्या गाई वेदनेने तडफडत असल्याचे निदर्शनास आले. गाईच्या पोटातील वासरू बाहेर येत नसल्याने ती जीवाच्या आकांताने तडफडत होती. प्रसूती अडकल्यामुळे गाईची अवस्था अत्यंत गंभीर बनली होती.

ही परिस्थिती लक्षात येताच पत्रकार शरद रेडेकर यांनी तात्काळ डॉ. संतोष शामदीरे यांना फोनद्वारे संपर्क साधला. डॉ. शामदीरे यांनी कोणतीही विलंब न करता सेवाभावी वृत्तीने तत्काळ घटनास्थळी ◀◀ पान ३ वर

# दु:खावर फुंकर घालणारी पत्रकारांची माणुसकी

## डोंगरे कुटुंबासाठी मदत फेरीतून उभारला एक लाखांचा भक्कम आधार

वडवणी । प्रतिनिधी

डोंगरेवाडी येथील ऊसतोड मजुर गणेश डोंगरे यांचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याने एका कष्टकरी कुटुंबाचा कणा मोडला. कुटुंबाचा आधारवड हिरावल्याने वयोवृद्ध आई-वडील,पत्नी आणि मुलींवर दुःखाचा डोंगर कोसळला. अशा अत्यंत वेदनादायी परिस्थितीत वडवणी तालुक्यातील पत्रकारांनी केवळ बातमीपुरते मर्यादित न राहता माणुसकीचा झेंडा उंचावत थेट मदतीसाठी पुढाकार घेतला.

पत्रकारांच्या वतीने काढण्यात आलेल्या मदत फेरीला वडवणी शहरातील व्यापारी बांधवांसह नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




व्यापारी, व्यावसायिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांनी डोळ्यांत करुणा आणि मनात सहवेदना ठेवून सढळ हाताने मदत केली. या एकजुटीच्या प्रयत्नातून तब्बल एक लाख रुपयांची रक्कम जमा झाली आहे.

ही रक्कम मृत ऊसतोड कामगाराच्या मुलींच्या शिक्षण आणि उज्ज्वल भविष्यासाठी त्यांच्या नावाने बँकेत मुदत ठेव (एफडी) स्वरूपात ठेवण्यात येणार आहे. कर्त्या पुरुषाच्या अकाली जाण्याने पोरकं झालेलं कुटुंब पुन्हा उभं राहावं, मुलींच्या शिक्षणात कोणतीही अडचण येऊ नये, या उदात्त हेतूने पत्रकार ◀◀ पान ३ वर

# गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करा - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी भविष्यात स्पर्धेचा काळ ओळखून आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करत उज्वल भविष्य घडविण्याचे प्रयत्न करावेत असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



सौ.के.एस.के. अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, हर्षद क्षीरसागर, सहसचिव गोविंद साळूंके, कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी. मोरे, अन्नतंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.झेड.एच. सय्यद, प्रा.डॉ.एस.टी. शिंदे, प्रा. डॉ. व्ही.बी. तागड, प्रा.पी.जी. पौळ, डॉ.जी.पी. राऊत, प्रा.के.डी. नागरगोजे, प्रा.डॉ.जी.एम.बोडखे, प्रा.डी.ए.मुटकुळे, प्रा.बी.आर. चादर, प्रा.एस.आर.मस्के, प्रा.ए.सी. गार्डी, एल.एम. बोंद्रे आदिंसह सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी स्नेहा दुधाळ, वेदांत स्वामी, अमित दळवी , अभिजीत निकम, गिता परजने, वैष्णवी भोंडवे, श्रेया लांब, घोडके सुरेश, मळेकर आशिष आदि विद्यार्थ्यांचा माजी मंत्री क्षीरसागरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी बोलताना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की, अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले ही अभिमानाची बाब आहे. आपल्या संस्थेचे नाव उज्वल करणाऱ्या विद्यार्थ्यांना आपण प्रोत्साहन देत असतो. याच विद्यार्थ्यांची प्रेरणा घेऊन यश मिळवावे. विद्यार्थ्यांना भविष्य काळात स्पर्धेच्या युगात टिकवून रहायचे असेल तर गुणवत्तेला प्राधान्य द्यावे लागेल. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून यशाकडे वाटचाल करावी. उज्वल भविष्य ◀◀ पान ३ वर

# जिनिंग व सोयाबीन खरेदी केंद्रावरील शेतकऱ्यांची लूट थांबवा

## शेतकरी हक्क मोर्चाचा जिल्हाधिकाऱ्यांना बेमुदत आंदोलनाचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात कापूस व सोयाबीन खरेदी प्रक्रियेत शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर अडवणूक व लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आला आहे. कापूस खरेदी करताना शेतकऱ्यांच्या कापसाला जाणीवपूर्वक कमी प्रतवारी (ग्रेडिंग) देऊन हमीभावापेक्षा कमी दर दिला जात असल्याचे प्रकार उघडकीस येत आहेत.

तसेच जिल्ह्यातील अनेक सोयाबीन खरेदी केंद्रांवर प्रतवारीच्या नावाखाली शेतकऱ्यांना परत पाठवले



जात असून अनेक ठिकाणी हमीभावापेक्षा कमी दराने सोयाबीन खरेदी केली जात आहे. हा प्रकार सीसीआयमार्फत चालवल्या जाणाऱ्या शासकीय कापूस खरेदी केंद्रे व सोयाबीन खरेदी केंद्रांवर सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या गंभीर बाबीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांची होणारी लूट व हेळसांड तात्काळ थांबवावी, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. जिल्हाधिकारी व जिल्हा निबंधक यांनी या प्रकरणात तात्काळ लक्ष घालून सीसीआय अंतर्गत चालणाऱ्या जिनिंग व सोयाबीन खरेदी केंद्रांवरील गैरप्रकार थांबवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा शेतकरी पुत्रांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk
दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार दि.१० जानेवारी २०२६ । पान ७

# पुणे महापालिकेवर भगवा फडकवा, विरोधकांना कात्रज घाट दाखवा, कोऱ्या पाटीवर विकासाची अक्षरे लिहा, एकनाथ

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेसाठी शिवसेनेची पाटी कोरी असली, तरी त्या पाटीवर विकासाची अक्षरे लिहिण्याची ताकद शिवसेनेत आहे. पुणेकरांनी शिवसेनेला भरभरून मतदान करुन विरोधकांना कात्रजचा घाट दाखवावा आणि पुणे महापालिकेवर भगवा फडकवावा, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कात्रज येथील जाहीर सभेत केले. पुणे महापालिकेची निवडणूक शिवसेना स्वबळावर लढत असून कार्यकर्ते व पदाधिकारी ताकदीने कामाला लागले आहेत, त्यामुळे विजय आमचाच होणार, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला. शिवसेनेच्या कात्रज येथील जाहीर सभेला जनसागर लोटला होता. विशेष करुन लाडक्या बहिणींची प्रचंड गर्दी होती.

सभेत मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या लाडक्या बहिणीकडे लक्ष वेधत शिंदे म्हणाले की, प्रत्येक सभा, रोड शो आणि प्रचार रॅलीत ‘लाडक्या बहिणींची’ संख्या लक्षणीय वाढताना दिसत आहे. महिलांचा सहभाग हा विजयाचा पाया असून ज्या उमेदवारांच्या पाठीशी महिला ठाम उभ्या असतात, त्यांचा मतपेटीत क्रमांक पहिलाच असतो, असा अनुभव विधानसभेपासून नगरपरिषदांपर्यंत घेतल्याचे त्यांनी सांगितले. लोकसभा, विधानसभा आणि नगरपरिषदेत हॅट्ट्रिक झाली असून आता महापालिकेत चौकार मारायचा आहे, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. पुणे हे महाराष्ट्राचे चैतन्य आणि विद्येचे माहेरघर असल्याचे सांगत, अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करणाऱ्या पुणे महापालिकेला विकासाचे अमृत देण्याची गरज असल्याचे शिंदे म्हणाले. आमचा अजेंडा सत्ता नाही, तर विकास आहे. सर्वसामान्यांच्या आयुष्यात बदल घडवणारा विकास हाच शिवसेनेचा झेंडा आहे, असे ते म्हणाले. मुख्यमंत्रीपदाच्या अडीच वर्षांच्या कारकिर्दीत विकासाभिमुख व लोककल्याणकारी निर्णय घेतल्याचा दाखला देत त्यांनी चांदणी चौकातील वाहतूक कोंडी सोडवल्याचा अनुभव सांगितला आणि कात्रजची वाहतूक कोंडीही दूर केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा शब्द दिला. शिवसेना स्वबळावर लढत असल्याने तिला हलक्यात घेऊ नये, असा इशाराही शिंदे यांनी दिला. मी बोलतो ते करतो. एकदा



कमिटमेंट केली की मागे हटत नाही, असे सांगत त्यांनी लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही, याची ग्वाही दिली. विरोध झाला, कोर्टात गेले तरीही योजना सुरू राहिली, कारण हा तुमचा एकनाथ शिंदे ठामपणे उभा होता, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यकर्त्यांचा पक्ष म्हणून शिवसेनेची ओळख अधोरेखित करताना शिंदे म्हणाले की, शिवसेनेत मालक-नोकर नाहीत, सर्वजण सहकारी आहेत. कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडणारी शिवसेना नाही. छातीवर वार घेणारे, कार्यकर्त्यांसाठी पुढे उभे राहणारे नेते आणि पदाधिकारी आमच्याकडे आहेत. कार्यकर्त्यांना मान-सन्मान मिळालाच पाहिजे, कारण निवडणुकीत विजयाचा कणा कार्यकर्ताच असतो, असे ते म्हणाले. विकासकामांचा तपशील देताना शिंदे यांनी प्रभाग ३८ साठी पाणीपुरवठा योजनेसाठी २ कोटी रुपये, रस्त्यांसाठी २५ कोटी रुपये, जांभूळवाडी तलाव सुशोभीकरण व जॉगिंग ट्रॅकसाठी ५८ कोटी रुपये मंजूर केल्याचे सांगितले. नरेंगाव, जांभूळवाडी, कोळेवाडी, भिलारेवाडी, गुजरवाडी, निंबाळकरवाडी आदी गावांसाठी ड्रेनेज लाईनसाठी १५९ कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कात्रज परिसरातील रस्ते रुंदीकरण, उड्डाणपूल, वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा, करआकारणीतील अन्याय दूर करण्याचे आश्वासन देत ट्रॅफिकमुक्त पुणे आणि ट्रॅफिकमुक्त कात्रज करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# ‘एआय’ तंत्रज्ञानाला मिळणार प्रोत्साहन; इनोव्हेशन फाउंडेशनच्या वतीने ‘इनोव्हेट यू टेकॅथॉन ३.०२ चे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**




महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील नाविन्यपूर्ण संकल्पनांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्यातील उद्यमशीलतेला पाठबळ देण्याच्या उद्देशाने इनोव्हेशन फाउंडेशनच्या वतीने ‘इनोव्हेट यू टेकॅथॉन ३.०’ या राष्ट्रीय स्तरावरील हॅकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २१ आणि २२ फेब्रुवारी २०२६ रोजी ‘एआयएसएसएमएस’ इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयओआयटी) महाविद्यालयात पार पडणार असल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष कल्पेश यादव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या हॅकेथॉनचे हे तिसरे वर्ष असून, यंदा सामाजिक समस्यांवर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्रभावी उपाय शोधण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा कल्पक वापर करणाऱ्या प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन दिले जाईल. तसेच, सर्वाधिक नाविन्यपूर्ण प्रकल्पासाठी ‘इनोव्हेशन अवॉर्ड’ आणि लाखो रुपयांची रोख पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. एड्युटेक, पर्यावरण, आरोग्यसेवा, ट्रॅफिक मॅनेजमेंट, आपत्ती व्यवस्थापन आणि ग्रिटेक अशा विविध विषयांवरील समस्या आव्हाने म्हणून विद्यार्थ्यांसमोर ठेवल्या जातील.


या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, एआयसीटीई, एमआयडीसी आणि सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठासह अनेक शासकीय व शैक्षणिक संस्थांचा सहकार्य लाभला आहे. इंजिनीअरिंग, पॉलिटेक्निक, बीसीए, एमसीए आणि बी-टेक ग्री अभ्यासक्रमांचे विद्यार्थी ३ ते ४ जणांच्या गटाने यात सहभागी होऊ शकतात. केवळ स्पर्धाच नव्हे, तर विजयी प्रकल्पांना प्रत्यक्षात आणण्यासाठी फाउंडेशनकडून मेंटरिंग, बूटकॅम्प आणि स्टार्टअप एक्स्पोच्या माध्यमातून मार्गदर्शनही दिले जाणार आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांनी ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ळपर्पीरींर्ज्ञी.ळप या संकेतस्थळावर आपली नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे. सहभागी स्पर्धकांसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम सोय करण्यात आली असून, नोंदणीसाठी काही अडचण असल्यास संकेतस्थळावरील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कल्पेश यादव यांनी यावेळी केले.

# पिरंगुट येथील गोळीबार प्रकरणातील आरोपीस जामीन मंजूर

**पुणे । प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यातील पिरंगुट सावकारवाडी येथे तरुणावर झालेल्या गोळीबार प्रकरणी महेश तानाजी कदम (रा. पिरंगुट) याला जिल्हा व सत्र न्यायाधीश रागीट साहेब यांनी जामीन मंजूर केला आहे. त्याने ॲड. अभिषेक हरगणे यांच्या मार्फत जामिनासाठी अर्ज केला होता.



बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून सदर आरोपीला ५० हजाराच्या जातमुचलक्यावर न्यायालयाने हा आदेश दिला. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी बावधन पोलीस स्टेशन येथे या घटनेची एफ आय आर नोंदविण्यात आली होती. पिरंगुट सावकारवाडी येथे मटण पार्टी मध्ये झालेल्या वादावरून पिरंगुट येथे एका तरुणावर गावठी कट्ट्यामधून गोळीबार करण्यात आला होता.

या प्रकरणात महेश सह एकूण ३ आरोपींविरुद्ध बेकायदा अग्नी शस्त्र बाळगणे, धमकी देणे व खुनाचा प्रयत्न करणे प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून जामीन मंजूर करण्यात आला. ॲड हरगणे यांच्या सोबत ॲड. ओंकार फडतरे, ॲड.अजिंक्य पोळ, ॲड. कोमल धुमाळ, ॲड. मयूर जमदाडे, ॲड. अयान पानसरे यांनी कामकाज पाहिले.

# पोलिस उपनिरीक्षकाने संपवला जीव

**पुणे । प्रतिनिधी**

विषारी औषध प्राशन करून एका पोलिस उपनिरीक्षकाने आपटे रस्त्यावरील एव्हरेस्ट हॉटेलमध्ये आत्महत्या केली. बुधवारी (दि. ७) दुपारी एक वाजताच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. सुरज सुभाष मराठे (वय ३०, रा. देहूरोड, आळंदी) असे आत्महत्या केलेल्या पोलिस उपनिरीक्षकाचे नाव आहे.

आत्महत्या करण्यापूर्वी सुरज यांनी सुसाईड नोट लिहिली असून, त्यामध्ये कोणाला जबाबदार धरू नये. माझ्या वैयक्तिक ऑपरेशनच्या कारणातून आत्महत्या करीत आहे, असे नमूद केले आहे. सुरज हा गुडघ्याच्या विकाराने ग्रास्त होता, असे त्याच्या कुटुंबीयांनी सांगितले, अशी माहिती डेक्कन पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीशा निंबाळकर यांनी दिली. याबाबत डेक्कन पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुरज हा



मुळचा देहूरोड-आळंदी येथील राहणारा आहे. १२४ बॅचचा प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर तो पोलिस खात्यात पोलिस उपनिरीक्षक या पदावर रुजू झाला होता. प्रोबोशन कालावधी संपल्यानंतर त्याची नेमणूक सांगली जिल्ह्यातील तासगाव पोलिस ठाण्यात झाली होती. दरम्यान, ३० डिसेंबर रोजी वैद्यकीय रजेवर सुटी घेऊन तो पुण्यात आला होता. आपटे रस्त्यावरील एव्हरेस्ट हॉटेलमध्ये तो थांबला होता, तर दुसरीकडे त्याचे नातेवाईक देखील त्याला शोधत होते. मंगळवारी दुपारी बारा वाजल्यापासून त्याचा फोन तो उचलत नव्हता.सुरज पुण्यात येताना नातेवाइकाची गाडी घेऊन आला होता. त्या गाडीला जीपीएस ट्रॅकर होता. त्यामुळे गाडी आपटे रस्ता परिसरात असल्याचे आढळून आली. नातेवाइकाने सुरज थांबलेल्या हॉटलमध्ये चौकशी केली. हॉटेलमधील कर्मचाऱ्यांना बोलावून त्याच्या खोलीचा दरवाजा वाजविला. परंतु, प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे मास्टर चावीने खोली उघडली तेव्हा सुरज निपचित पडलेला दिसून आला. यानंतर डेक्कन पोलिसांना ही माहिती देण्यात आली. चौकशीत सुरजने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याचे समोर आले.

# रात्री एमजी रस्त्यावरील कपड्यांची दुकाने फोडणारा चोरटा जेरबंद



**पुणे । प्रतिनिधी**

रात्रीच्यावेळी एमजी रस्त्यावरील कपड्यांची दुकाने फोडून चोरी करणाऱ्या चोरट्याला लष्कर पोलिसांनी पकडले. निर्मल सोनार (वय.१८,रा.नेपाळ) असे त्याचे नाव आहे. यावेळी त्याच्या तिघा विधीसंघर्षीत साथीदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सोनार याच्याकडून गुन्ह्यात वापरेल्या दोन दुचाकी, चोरीचा लॅपाटॉप, कटावणी, चोरी केलेले कपडे असा ३ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कॅम्प परिसरातील एमजी रस्त्यावरील एका दुकानातून चोरट्यांनी कपड्यांची चोरी केली होती. याप्रकरणी, लष्कर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास करत असताना, तांत्रिकविश्र्लेषाद्वारे सोनार याला ताब्यात घेतले. सोनार अल्पवयीन साथीदारांच्या मदतीने चोरी करत असल्याचे पुढे आले आहे.ही कामगिरी वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीषकुमार दिघावकर, गुन्हे निरीक्षक प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक राहुल घाडगे, कर्मचारी महेश कदम, अतुल मेंगे, सोमनाथ बनसोडे, प्रविण गायकवाड यांच्या पथकाने केली.

# पुण्यात १६ जानेवारीपासून २४ व्या ‘पुणे प्रॉपर्टी एक्स्पो २०२६’चे आयोजन; ४०० हून अधिक गृहप्रकल्पांची मेजवानी

**पुणे । प्रतिनिधी**

क्रेडाई पुणे यांच्या वार्षिक प्रॉपर्टी प्रदर्शनाचा २४ वा आवृत्ती असलेला ‘पुणे प्रॉपर्टी एक्स्पो २०२६’ दि. १६ ते १८ जानेवारी २०२६ दरम्यान ॲग्रिकल्चर कॉलेज ग्राउंड, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. यात ८५ हून अधिक विश्वासार्ह विकासक सहभागी होणार आहेत. पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीए परिसरातील ४०० पेक्षा अधिक रेरा-नोंदणीकृत प्रकल्प येथे सादर करण्यात येणार आहेत.

‘पूना टू पुणे’ या संकल्पनेवर आधारित या प्रदर्शनात शहराचा ऐतिहासिक प्रवास आणि भविष्योन्मुख, शाश्वत विकास अधोरेखित केला जाणार आहे. या एक्स्पोचे उद्घाटन दि. १६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता डॉ. अभय फिरोदिया, अध्यक्ष, फोर्स मोटर्स लिमिटेड यांच्या हस्ते होणार असून, डॉ. आनंद देशपांडे, संस्थापक, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पर्सिस्टंट सिस्टीम्स हे मान्यवर अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रदर्शनात तात्काळ डील्स, नामांकित वित्तसंस्थांकडून गृहकर्ज सहाय्य, लकी ड्रॉ आणि



आकर्षक भेटवस्तू अशी विशेष आकर्षणे असणार आहेत. मुख्य कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला दि. १५ जानेवारी २०२६ रोजी चॅनल पार्टनर्स व विकासकांसाठी देशातील सर्वात मोठा नेटवर्किंग कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून, त्यात सुमारे १,००० चॅनल पार्टनर्स सहभागी होणार आहेत. क्रेडाई पुणेचे अध्यक्ष मनीष जैन म्हणाले, पुणे प्रॉपर्टी एक्स्पो २०२६ हे रिअल इस्टेट क्षेत्रातील विश्वासार्हता, पारदर्शकता आणि जबाबदार वाढ यांप्रती क्रेडाई पुणेची बांधिलकी दर्शवते. पुणे हे मालमत्ता गुंतवणुकीसाठी अग्रगण्य शहरांपैकी एक असून, या एक्स्पोमध्ये ४०० पेक्षा अधिक रेरा-प्रमाणित प्रकल्प पाहायला मिळणार आहेत.

# दारू पिण्याची पैज भोवली; तरुणाचा मृत्यू

**पिंपरी । प्रतिनिधी**

पैज लावून अतिप्रमाणात दारू पाजल्यामुळे एका तरुणाचा मृत्यू झाला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी प्रेताची विल्हेवाट लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही घटना मंगळवार (दि. ३०) दुपारी ३ वाजताच्या सुमारास नवलाख उंबे येथील एका शेतात घडली.




या प्रकरणात पोलिस उपनिरीक्षक दीपक खरात यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, कृष्णा सिंह (३५, नवलाख उंबे, मूळ- रोहतास, बिहार) आणि विकास कुमार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील कृष्णा सिंह याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी मृत रामकुमार साह याला पैज लावून एकाच वेळी मोठ्या प्रमाणात दारू पिण्यास भाग पाडले. दारूच्या अतिसेवनामुळे त्याची प्रकृती बिघडली. त्यानंतर त्याला वैद्यकीय उपचार दिले नाहीत, ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर आरोपींनी गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहाची विल्हेवाट लावली. तळेगाव एमआयडीसी पोलिस तपास करत आहेत.

# दारु परवाना निलंबनाला उच्च न्यायालयाची स्थगिती; ‘२ बीएचके डिनर अँड की क्लब’ पुन्हा सुरु करण्याचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

‘२ बीएचके डिनर अँड की क्लब’ या प्रसिद्ध हॉटेल व क्लबचा दारू विक्री परवाना निलंबित करण्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आदेशाला उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. डॉ. हेरंब शेलके यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने परवाना निलंबनाच्या आदेशाला स्थगिती देत, संबंधित आस्थापना तात्काळ डी-सील करून पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.



या प्रकरणात डॉ. हेरंब शेलके यांच्या वतीने ज्येष्ठ वकील प्रल्हाद परांजपे यांनी बाजू मांडली. त्यांनी उत्पादन शुल्क विभागाची कारवाई ही मनमानी व अधिकाराचा गैरवापर करणारी असल्याचा युक्तिवाद केला. न्यायालयाने यावर दखल घेत, १५ दिवसांच्या बंदीचा आदेश स्थगित केला. या निर्णयानंतर ‘२ बीएचके डिनर अँड की क्लब’ तात्काळ सुरू होणार असून, हा निकाल कायदा व सुव्यवस्था अबाधित असल्याचे अधोरेखित करणारा असल्याचे डॉ. हेरंब शेलके यांनी सांगितले. कायद्यापुढे कोणीही मोठे नाही आणि शेवटी सत्याचाच विजय होतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. उच्च न्यायालयाच्या या निकालामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जबाबदाऱ्या व उत्तरदायित्वाबाबत एक महत्त्वाचा न्यायनिवाडा झाला असून, भविष्यातील नियामक कारवाईसाठीही हा निर्णय मार्गदर्शक ठरणार आहे. दरम्यान, ‘२ बीएचके डिनर अँड की क्लब’ चे ब्रँड ओनर डॉ. हेरंब शेलके यांनी या कठीण काळात ग्राहकांकडून मिळालेल्या पाठिंबा व न्यायव्यवस्थेवर व्यक्त केलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले आहेत. आगामी काळातही स्थानिक खाद्यसंस्कृतीत योगदान देत, दर्जेदार सेवा सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# आम्ही लांडग्यांकडे...’; तुकारामांच्या अभंगाचा दाखला देत अमोल मिटकरींनी घेतला महेश लांडगेंचा समाचार

**पुणे । प्रतिनिधी**

निवडणुका जवळ आल्या की राजकीय पक्ष एकमेकांवर आरोप करतात, टीका करतात. सध्या हेच चित्र भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पाहायला मिळत आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेवर मागील काही वर्षांपासून भाजपची सत्ता आहे. शहरातील खराब रस्ते, वाढती वाहतूक कोंडी, कचऱ्याचा प्रश्न, पाणीटंचाई आणि भ्रष्टाचार हे मुद्दे नेहमी चर्चेत असतात. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते म्हणतात की, भाजपच्या काळात शहरांचा विकास अपेक्षेप्रमाणे झाला नाही.



याच मुद्द्यांवरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील कामकाजावर टीका केली. त्यांनी थेट भाजपच्या स्थानिक नेत्यांना जबाबदार धरले. अजित पवारांच्या या वक्तव्यामुळे भाजपचे नेते आक्रमक झाले. यानंतर भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी अजित पवारांवर जोरदार टीका केली. अजित पवार हे पुण्याचे आणि महाराष्ट्राचे ‘आका’ असल्याचं त्यांनी म्हटलं. यामुळे मोठा वाद निर्माण झाला. लांडगे यांनी अजित पवार स्वतःवरील आरोप झाकण्यासाठी भाजपमध्ये आले, असा आरोपही केला. त्यामुळे हा विषय केवळ राजकीय टीकेपुरता मर्यादित राहिला नाही.

या सगळ्यावर अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली नाही. मी कोण आहे, हे जनता ठरवेल, असे त्यांनी सांगितले. योग्य वेळी उत्तर देईन, असे म्हणत त्यांनी विषय संपवला. त्यांनी केवळ शहरातील प्रश्न मांडले असून कुणावर वैयक्तिक हल्ला केलेला नाही, अशी त्यांची भूमिका होती. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी पुढे आले. त्यांनी महेश लांडगे यांच्या वक्तव्यावर टीका केली. आम्ही लांडग्यांकडे लक्ष देत नाही, राष्ट्रवादी काँग्रेसचा वारसा हा शरद पवार आणि अजित पवारांचा आहे ते सिंह आणि वाघ आहेत, असं म्हणत अमोल मिटकरी यांनी महेश लांडगेंचा समाचार घेतला. अशा आरोपांवर अजित पवार लक्ष देत नसल्याचा टोला त्यांनी लगावला. यावेळी त्यांनी संत तुकारामांच्या अभंगाचा दाखलाही दिला. भुंकणाऱ्या कुत्र्यांना भुंकू द्या, त्यांच्याकडे लक्ष देऊ नका'' असा टोलाही त्यांनी लगावला. महापालिका निवडणुका जवळ येत असताना भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील आरोप-प्रत्यारोप वाढताना दिसत आहेत.

# मतदान, मतमोजणीची तयारी पूर्ण

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान होणार असून, मतमोजणी १६ जानेवारीला होणार आहे. या निवडणुकीसाठी एकूण ६९१ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे असून, या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासनामार्फत सर्व तयारी करण्यात आली आहे. त्याबाबत राज्य निवडणूक आयुक्त दीनेश वाघमारे यांनी आढावा घेतला.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी ऑनलाईन बैठकीद्वारे महापालिका प्रशासनाकडील निवडणूक तयारीचा आढावा घेतला. महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी निवडणूक प्रक्रिया शांततेत, पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी करण्यात आलेल्या विविध नियोजनात्मक बाबींची माहिती दिली. बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, आचारसंहिता कक्षप्रमुख सुरेखा माने, सहआयुक्त मनोज लोणकर, स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार, सहायक नगररचनाकार प्रशांत शिंपी, उपायुक्त व्यंकटेश दुर्वास, अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड आदी उपस्थित होते. बैठकीत मतदार यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया, संभाव्य दुबार मतदान टाळण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना, स्ट्राँग रूमची सुरक्षित व्यवस्था, मतमोजणी केंद्रांची आखणी, निवडणूक कालावधीत माहिती संकलन व प्रसारासाठी स्थापन करण्यात आलेल्या मीडिया सेलच्या कार्यपद्धती याबाबत माहिती देण्यात आली.

मतदान व मतमोजणीसाठी अधिकारी व कर्मचार्यांसाठी प्रशिक्षण प्रक्रिया सुरू आहे. उमेदवारांच्या निवडणूक खर्च तपासणीची कार्यवाही प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी राबविण्यात येणार्या मतदान जनजागृती कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्यासोबत नियमित बैठकांचे आयोजन करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मतदारांच्या तक्रारींच्या तात्काळ निवारणासाठी तक्रार निवारण केंद्र, प्रसारमाध्यमांमधील जाहिराती व बातम्यांवर देखरेख ठेवण्यासाठी प्रसार माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती प्रभावीपणे कार्यरत असल्याची माहिती देण्यात आली. ईव्हीएम मशीनसाठी आवश्यक साहित्य, पोस्टल बॅलेट मतदानाची व्यवस्था, मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून निगराणी ठेवण्याबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. ईव्हीएम, स्ट्राँग रूम सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड नको : आयुक्त ईव्हीएम मशीन व स्ट्राँग रूमच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड करता कामा नये. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी आपापली कामे अत्यंत काटेकोरपणे व वेळेत पार पाडावीत. ईव्हीएम व स्ट्राँग रूमच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. लोकशाही प्रक्रियेची पारदर्शकता आणि सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी स्ट्राँग सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे, असे आदेश आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिले आहेत. या वेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी हिम्मत खराडे, डॉ. दिप्ती सूर्यवंशी, डॉ. अर्चना पठारे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, तानाजी नरळे, पूजा दुधनाळे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, कार्यकारी अभियंता शिवराज वाडकर, सोहम निकम, सतीश वाघमारे उपस्थित होते.

cmyk